# हाकारा

वर्ष सतरावे • अंक पहिला
जानेवारी - मार्च १९९६



# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

स्फूर्तिस्थान / प्रेरणा : *कै. प्रा. गं. बा. सरदार*

## कार्यकारी मंडळ

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | डॉ. पी. व्ही. सुखात्मे (पद्मभूषण) |
| उपाध्यक्ष | : | प्रा. व्ही. जी. पेंढारकर |
| मुख्य सचिव | : | प्रा. रा. के. मुटाटकर |
| खजिनदार | : | डॉ. व्ही. एस. कुलकर्णी |
| सभासद | : | डॉ. एन. एस. देवधर |
| | : | डॉ. बी. व्ही. भानू |
| | : | डॉ. मिलिंद बोकील |
| | : | डॉ. एस. जी. देवगावकर |
| | : | ॲड. पद्माकर वळवी |

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता !

**महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक**

# हाकारा

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| | या अंकाविषयी | | २ |
| १. | मणिपूरमधील वांशिक समस्या : नागा-कुकी जमातींचा संघर्ष | : शिमरे, लुईथुई, बोस | ३ |
| २. | नागालँडमधील आदिवासी जमाती - भाग १ | : पुरूषोत्तम आगाशे | १३ |
| ३. | मुस्लिम धर्मानुयायी - तडवी भिल्ल | : कै. मीरा तडवी | १८ |
| ४. | कर्नाटकातील सिद्धी जमात | : डॉ. शौनक कुलकर्णी | २३ |
| ५. | दरिद्री नारायण आदिवासींचा शोध व बोध | : कै. मीरा तडवी | २५ |
| ६. | आदिवासी आणि ग्रामीण विकास | : वाहरू सोनवणे | ३१ |
| ७. | जात : मूलतःच अन्यायी समाजव्यवस्था | : ग. शां. पंडित | ३५ |
| | कविता - किंग लायेन | : भुजंग मेश्राम | ३८ |
| | कविता - गुपित | : भुजंग मेश्राम | ३९ |



वर्ष सतरावे : अंक -पहिला

जानेवारी - मार्च १९९६

**पत्रव्यवहाराचा पत्ता**

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

६४, आनंद पार्क, औंध,

पुणे - ४११ ००७.

फोन : ३८७२१९

**संपादक**

रामचंद्र मुटाटकर

**कार्यकारी संपादक**

ग. शां. पंडित

**चित्रकार व संपादन सहाय्य**

पुरुषोत्तम आगाशे

**मूल्य रू. १५/-**

**प्रकाशक**

रा. के. मुटाटकर

सचिव, महाराष्ट्र मानव विज्ञान

परिषद यांच्यासाठी

ज्ञान प्रबोधिनी मुद्रण विभाग

५१०, सदाशिव पेठ, पुणे ३०.

येथे छापून पुणे येथे प्रसिध्द केले

**अक्षरजुळणी**

असाईन सिस्टीम्स्

दत्तवाडी, पुणे ३०.



अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी किंवा मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

## या अंकाविषयी....

*'हाकारा' चा यावेळचा विशेषांक आपल्याला निरनिराळ्या आदिवासी जमाती त्यांची जीवन पद्धती, संस्कृती त्यांचा इतिहास, त्यांच्या समस्या या गोष्टींची ओळख करून देणारा आहे.*

*ईशान्य भारतातील डोंगराळ प्रदेशातून अनेक आदिवासी जमाती रहात आहेत. मात्र त्या भागातील जमातींबद्दल फारच थोडे साहित्य उपलब्ध आहे. गेल्या तीन चार वर्षापासून मणिपूरमध्ये सुरू असलेल्या नागा-कुकी संघर्षाबद्दल आपल्याला बरेचदा वृत्तपत्रातून त्रोटक बातम्या वाचायला मिळतात. आणि म्हणूनच या संघर्षाची पार्श्वभूमी, इतिहास, संघर्षाला कारणीभूत ठरलेले घटक आदि गोष्टींची 'मणिपूरमधील वांशिक समस्या' या लेखातील सविस्तर माहिती वाचकांना निश्चितच उद्‌बोधक ठरेल. नागालँडमधील आदिवासी जमातींची ओळख श्री. पुरुषोत्तम आगाशे यांनी दुसऱ्या लेखातून करून दिली आहे.*

*जळगाव जिल्ह्यातील तडवी भिल्ल व शेकडो वर्षापूर्वी आफ्रिकेतून कर्नाटकात स्थलांतरित झालेल्या सिद्धी जमातीविषयीचे माहितीपूर्ण लेख सामाजिक शास्त्राच्या अभ्यासकांना खचितच उपयोगी पडतील.*

*वाहरू सोनावणे यांचा 'आदिवासी आणि ग्रामीण विकास' तसेच ग. शां. पंडित यांचा जाती व्यवस्थेविषयी ऊहापोह करणारा लेख आपल्याला निश्चितच विचार करायला लावणारे आहेत.*

*नेहमीप्रमाणे श्री. भुजंग मेश्राम यांच्या आशयघन कविता देखील आहेतच.*

*हा अंक सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासकांना मार्गदर्शन व सर्वसामान्यांना माहितीपूर्ण ठरणारा आहे. आपल्या प्रतिक्रिया जरूर कळवाव्यात.*

**- संपादक**

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने या नियतकालिकास अनुदान दिले असले तरी नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

# मणिपूरमधील वांशिक समस्या:
## नागा-कुकी जमातींचा संघर्ष

शिमरे, लुईथुई, बोस - नागा विद्यार्थी संघटना
(अनुवाद : अभय कुदळे)

एका शतकाहून जास्त काळ कुकी आणि नागा लोक शांततेने एकत्र नांदत आहेत. पण गेल्या दोन वर्षातच या जमातींमधल्या चकमकींमध्ये अचानक वाढ झाली आहे. या अचानक उसळलेल्या हिंसेचे कारण शोधण्यासाठी या भिन्न जमातिंविषयीचा इतिहास, त्यांच्या समस्येचे मूळ आणि सैन्यदल भारत सरकारची त्या मागची भूमिका जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

### मणिपूरातील भिन्न जमातिविषयक प्रश्नांची तोंडओळख :

मणिपूर राज्य हे उत्तरेला नागालॅण्ड, पूर्वेला रॉन, दक्षिणेला म्यानमार (बर्मा) नैऋत्येला मिझोराम आणि पश्चिमेला आसामचा काचर जिल्हा ह्यांनी वेढलेले आहे.

भारतीय संघराज्यातले मणिपूर हे एक छोटेसे राज्य असून त्याचे एकूण क्षेत्रफळ २२,१२९ चौरस कि.मी. आहे. २०४० कि.मी. चे खोरे वगळता बाकीचे मणिपूर हे डोंगराळ भागात वसले आहे. मणिपूरमधील बहुसंख्य (६७.५%) लोक खोऱ्यात राहतात. मोठ - मोठाल्या टेकड्यांनी राज्याचा ९०% भाग व्यापला आहे आणि या भागात जवळ जवळ ३२.५% अनुसूचित जमातींचे लोक राहतात. मणिपूरमधील एकूण १८ लाख लोकसंख्या भिन्नभिन्न जमातींची आणि संस्कृतींची विविधता प्रतिबिंबित करते आणि याचे महत्वाचे कारण म्हणजे मणिपूर हे प्राचीन काळी भारत आणि आग्नेय आशियातील व्यापारी मार्गावरचे ठिकाण होते. आर्य, मंगोलियन तसेच द्राविडीयन लोकांचे अनेक शतकांपासून मार्गक्रमण याच प्रदेशातून होत होते.

मणिपूर राज्य इंफाळ, बिष्णुपूर, थोबल, उखरूल, सेनापति, तामेन्गलॉन्ग, चुराचन्दपुर आणि चंदेल या आठ जिल्ह्यांचे मिळून बनलेले आहे. वरील आठपैकी तीन जिल्हे हे पूर्णपणे खोऱ्यात वसलेले असून ब्रिटिश राज्यात सामिलीकरण होण्याआधीचे जुने मणिपूर राज्य हे या तीन जिल्ह्यांचेच बनले होते. उरलेले पाच जिल्हे हे राज्याच्या जडणघडणीच्या वेळी आणि भारताच्या स्वातंत्र्यानंतर मणिपूर राज्यास जोडले गेले. खोऱ्यातील इम्फाळ आणि थोबाल जिल्हे वैष्णवी मितेइस या लोकांचे प्रभुत्व दर्शवितात. पण याशिवाय 'पांगा' किंवा 'पांगाल' या नावाने ओळखले जाणारे मणिपूरी मुस्लीम तसेच नागा (झेलिअनग्रौंग, तांगखुल, मरिंग्ज, मायोन, अनाल) कुकी (थाडोस, गांगटेस, वाईफाईस, हमारस पाईड्स) मिझो लोक आणि भारताच्या राज्यांतून इथे आलेले अनेक स्थलांतरित नागरिकदेखील इथे राहतात.

शेती हाच मणिपुरी लोकांचा मुख्य व्यवसाय होय. पण असे असले तरी शेतीचे अत्यल्प उत्पन्न बघता इथले शेतकरी जेमतेम पोटापुरतेच पिकवू शकतात. हातमाग, विणकाम आणि बांबूच्या वस्तू बनविणे यांसारखे घरगुती उद्योगधंदे वगळता इतर कोणतेही उद्योगधंदे किंवा औद्योगिक कारखाने मणिपूरमध्ये नाहीत आणि यामुळेच मणिपूर, देशातील औद्योगिकदृष्ट्या मागासलेले राज्य म्हणून ओळखले जाते.

## मितेइस

१८९१ साली ब्रिटिश राज्यात सामिलीकरण होण्याआधी मणिपूर किंवा इम्फाळ खोरे हे स्वतंत्र राज्य म्हणून अस्तित्वात होते. १५ ऑक्टोबर १९४९ रोजी मणिपूर हे भारतीय संघराज्यात समाविष्ट झाले. प्रा. गान्गुमेइ काबुई यांच्या शब्दात सांगायचे म्हणजे मणिपूरची राजधानी इम्फाळ ही प्राचीन कांगला राजवाड्याच्या निन्गथोऊजा वंशातील मितेइस लोकांनी वसविली, वाढविली आणि मणिपूरमधील इतर सहा प्रमुख वंशातील लोकांवर वर्चस्व प्रस्थापित केले. इम्फाळ हा 'यमफा' या मणिपुरी शब्दाचा अपभ्रंश असून त्याचा अर्थ 'घरांचा समूह' असा आहे.

मितेइस लोक हे आपण मणिपूरचे मूळ रहिवासी असल्याचे ठासून सांगत असले तरी याबाबत फारसा पुरावा नाही. त्यांच्या जमातीच्या उगमाविषयी देखिल काही निश्चित सांगता येत नाही. वेगवेगळ्या विद्वानांचे यांबाबतीत वेगवेगळे मत असले तरी सर्वमान्य असलेली आजची कल्पना म्हणजे मणिपुरी लोक हे डोंगराळ भागातील जमातींची उपपत्ति होय. या डोंगराळ भागातील आणि मणिपुरी लोकांच्या संस्कृतीतले साम्य राज्याभिषेक समारंभामध्ये ठळकपणे प्रतिबिंबित होते जेव्हा राजा राणी नागा लोकांचा पोषाख करून सहभागी होत.

मितेइस विद्वान आर. के. रणजित सिंग यांच्या मते मितेइस लोकांचे पूर्वज जे एके काळी मणिपुरी होते त्यांच्या कथांवरून असे दिसून येते की आत्ताच्या चालू जमान्यापर्यंत मणिपुरी लोकांनी डोंगराळ भागातील लोकांच्या रूढी टिकवून धरल्या आहेत आणि या दोन भागातील लोकांमधील संबंध मितेइस लोकांच्या सुसंस्कृतपणामुळेच/ब्राम्हणवादामुळेच कमी झाला. याच विद्वानाच्या मते मितेइस लोकांची एकूण सात कुळे आहेत. - निंगथुजा, अंगोम, खुमाल, मोईरांग, लुवांग, सरांग लिशांगथेन, खाबा-नगाबा.

## पांगन

मणिपूरच्या एकूण लोकसंख्येपैकी १७% लोकसंख्या ही मणिपुरी मुस्लीमांची किंवा पांगन लोकांची आहे. हे लोक इम्फाळ आणि डोंगराळ भागातील नद्यांच्या काठावर आणि लोकटक सरोवराच्या आजूबाजूच्या दऱ्याखोऱ्यातील जिल्ह्यात स्थायिक झाले आहेत. त्यांच्या उपपत्तिविषयी देखील पुरेशी माहिती नसली तरी हॉडसनच्या मते पांगन लोक हे काचर जिल्ह्यात जेव्हा मितेइस लोकांनी युद्धकैदी नेले तेथून आले असावेत. पांगन हा शब्द बंगाल या शब्दाशी साम्य दाखवतो. (बंगन-पांगन)

बर्मातील एका बखरीनुसार मणिपूर राज्य स्थापन व्हायच्या आधीपासून तिथे मुस्लीम लोक होते आणि मणिपूरमधील त्यांची पहिली वसाहत ही राजा खान्गेनबाच्या युद्धकैद्यांचीच होती. बर्मा राज्यातील लोकांनी केलेल्या विनाशात इतर मणिपुरी जमातींप्रमाणेच पांगन जातीचे लोकखील या निर्दयी, निष्ठूर आक्रमकांच्या तावडीत सापडले आणि आत्ताचे पांगन लोक हे त्यावेळी वाचलेल्या पांगन लोकांचेच वंशज होत.

## मैदानी आणि डोंगराळ प्रदेशाची ऐतिहासिक पार्श्वभूमी :

उपलब्ध बखरींवरून असे स्पष्टपणे दिसून येते की ब्रिटिश यायच्या आधीपासून डोंगराळ भागातील जमाती आणि हिंदू राज्ये यांतील संबंध हे कायम लुटालूट करणे आणि सूड उगवणे यापुरतेच मर्यादित होते. सामाजिक रचनेतील अतीव फरक, पारंपारिक शिकवण, नीतीमूल्ये आणि धार्मिक व पारंपारिक बंधने यांतील विसंगती पाहता नागा लोक हे हिंदूच्याच नव्हे तर मुसलमानांच्या देखिल सामाजिक संपर्कात न येणे हे साहजिकच होते. नागा लोक हे समानतेच्या तत्त्वावर श्रद्धा असणारे लोक, ते हिंदू धर्मातील सामाजिक

विषमतेवर आणि केवळ जन्मावरून ठरणारी जीवनपद्धती वा गुलामी कदापि मानत नाहीत. हिंदू आणि मुस्लिमात काही विशिष्ठ प्रकारचे मांस खाणे निषिद्ध मानले जाते. त्यामुळे नागा लोकांचे गायींचे मांस वा डुकराचे मांस खाणे या लोकांना रूचत नव्हते. हिंदू, मुस्लिम व नागांच्या भिन्नभिन्न परंपरा, खाण्यावरची बंधने आणि नागा लोकांना अस्वच्छ व क्रूर समजणे आदि गोष्टी मैदानी प्रदेशातील राज्ये व स्वायत्त नागा राज्य यांच्या सौहार्दाचे वातावरण निर्माण होण्यामध्ये मुख्य अडथळा होती.

सन १८२० पर्यंत ब्रम्हपुत्रेच्या खोऱ्यातील अनेक हिंदू राज्ये व इम्फाळच्या खोऱ्यावर ब्रिटिशांनी आपला अंमल बसविला होता. १८३२ मध्ये मैदानी प्रदेशातील राजकन्येच्या बोलावण्यावरून ब्रिटिश फौजा नागा प्रदेशातून पुढे सरसावल्या त्यांना राजा गंभीरसिंगाच्या मणिपुरी फौजांनी मदत दिली.नागा लोकांकडून चिवट व कडवा प्रतिकार झाला. मणिपुरी राज्याचे ब्रिटिश फौजा बोलावण्यामागचे मुख्य कारण बर्मा फौजांनी चालवलेला विध्वंस आणि त्याचा बंदोबस्त करण्यात राज्याला आलेले अपयश हेच होते आणि त्याबदल्यात ब्रिटिश फौजांना अविरत धनसंपत्ती आणि कच्च्या मालाची सामुग्री बहाल केली गेली.

हिंदू राजे आणि ब्रिटिश फौजा दोघांचेही संयुक्त प्रयत्न नागांवर वर्चस्व मिळविण्यासाठी होते. त्यासाठी मैदानी प्रदेशालगतचे अनेक नागाप्रदेश संयुक्त फौजांनी बेचिराख केले. शेवटी १८४० मध्ये विजय मिळविण्यात अपयशी ठरलेल्या ब्रिटिशांनी कुकी जमातीच्या लोकांना मणिपूरमध्ये आणि नागा प्रदेशात विध्वंस करण्याच्या हेतूने घुसविले. ब्रिटिश आणि हिंदू राजांकडून मिळालेली हत्यारे आणि दारूगोळा यांच्या बळावर कुकी जमातीने नागा लोकांच्या कत्तली केल्या आणि त्यांच्या संपत्तीचा विनाश केला.

जेव्हा ब्रिटिशांनी एक तृतीयांश मणिपूर काबिज केला तेव्हा डोंगराळ आणि मैदानी प्रदेशातील फरक त्यांना जाणवला आणि जेव्हा नागा आणि ब्रिटिश लोक यांच्यात शांतता प्रस्थापित झाली तेव्हा या दोन डोंगराळ आणि मैदानी प्रदेशातील लोकांचा पारंपारिक विरोध वा झगडा हाच मोठा कायदा - सुव्यवस्थेचा प्रश्न बनून राहिला. नंतर नागा लोकांचे स्वातंत्र्याविषयीचे असीम, अपराजित प्रेम लक्षात येताच ब्रिटिशांना या डोंगराळ भागात नागा लोकांची लोकशाहीभिमुख राजकीय संरचना बदलून आपली प्रशासकीय राजवट आणणे अर्थहिन असल्याचे जाणवले आणि त्यांनी न्यायदानाचे आणि प्रशासकीय अधिकाराचे काम पूर्वापारपणे अधिकार असलेल्या नागा ग्राम परिषदेकडे सोपले.

## मणिपूरमधील जमाती

सर्वसाधारणपणे मणिपूरमधील जमातींचे नागा आणि कुकी असे वर्गीकरण केले जाते पण दक्षिणेकडच्या जिल्ह्यात राहणारे मिझो ही जमातदेखील मणिपूर राज्याच्या वांशिक राजकीय जमातीत तिसरा घटक म्हणून गणली जाते.

### नागा

'नागा' हे भौगोलिकदृष्ट्या विस्तारलेल्या आणि सांस्कृतिकदृष्ट्या विभिन्न लोकांच्या समूहाचे नाव आहे. नागा जमातीचे लोक भारताच्या ईशान्येकडील अरूणाचल प्रदेश, आसाम, मणिपूर, नागालॅण्ड तसेच नैऋत्येकडे म्यानमारपर्यंत आढळून येतात. नागा रहिवासी असलेल्या भागाची भारत आणि म्यानमार (बर्मा) अशा दोन देशात विभागणी ब्रिटिशांनी केली, भारतातून निघून जाण्यापूर्वी ब्रिटिशांनी नागाप्रदेशातील एक तृतीयांश भाग म्यानमारला तर उरलेला दोन तृतीयांश भाग भारताला दिला. आणि भारतातील नागा प्रदेशाची विभागणी वर उल्लेख केल्याप्रमाणे वेगवेगळ्या राज्यात भारत सरकारने स्वातंत्र्यानंतर केली. नागालॅण्डचा अपवाद वगळता या विभागणीमुळे नागा लोक केवळ एकमेकांपासून वेगळेच नव्हे तर

अल्पसंख्यांक म्हणून गणले जाऊ लागले. नागांनी डोंगराळ भागातील सुमारे १ लाख चौरस किलोमीटरचा प्रदेश व्यापला आहे आणि हा डोंगराळ भाग ईशान्येकडील हुकवँग खोरे, वायव्येकडील ब्रम्हपुत्रेचा पठाराकडील भाग, नैऋत्येकडील कच्छर आणि पूर्वेकडील चिंदविनने वेढला आहे. नागा लोक हे मंगोलियन वंशाचे लोक असून तिबेटी-बर्मन भाषा बोलतात. हजारो वर्षापूर्वी पूर्वेकडून सध्याच्या नागा बहुसंख्य असलेल्या प्रदेशात त्यांनी स्थलांतर केले. त्यांची एकूण लोकसंख्या ३० लाख आहे.

नागांच्या मूळ उपपत्तिविषयी अनेक सिद्धान्त मांडले गेले असले तरी एकही सिद्धान्त आत्तापर्यंत भक्कम पुरावे देऊ शकला नाही. नागांची कवड्यांबद्दलची आणि कोंच कवड्यांबद्दलची अति आवड लक्षात घेता नागा लोक हे कधी काळी समुद्रकिनारी राहत होते या निष्कर्षापर्यंत आपण येऊ शकतो. नागा लोकांच्या अनेक चाली-रिती, खाण्याच्या सवयी, विणकाम पद्धती, शेतीविषयक लागवडींविषयीच्या तंत्रज्ञान पद्धती या मोठ्या प्रमाणावर इंडोनेशियन, मलेशियन आणि फिलिपाइन्सच्या साम्य दर्शवितात.

माखेल हे नागा लोकांचे मूळ ठिकाण मानले जाते तिथून ते स्थलांतरित झाले.

नागा लोक लांबट गोल किंवा त्रिकोणी आकाराचे लहान मूल्यवान खडे घासून-पुसून जतन करून ठेवतात.

पॅलिओलिथिक किंवा निओलिथिक युगात नागा लोक त्यांची चीन ही मुख्य भूमी सोडून इरावती आणि चिंदविन खोऱ्यात जाऊन बर्मातील थँगदूतमध्ये आणि तेथून आत्ताच्या मणिपूरमधील सेनापति जिल्ह्यातील माखेल येथे पोहोचले आणि या माखेलहूनच ते आत्ता सध्या राहत असलेल्या प्रदेशात पोहोचले आणि पांगले. या सर्व स्थलांतराला पुष्टी नागांनी उभारलेल्या दगडी कीर्तीस्तंभांमुळे मिळते. नागा लोकांच्या दंतकथेत सांगितल्याप्रमाणे नागांच्या पूर्वजांनी एक पवित्र वृक्ष एकमेकांपासून दुरावण्याआधी लावला. अजूनही अस्तित्वात असलेल्या याठिकाणी एक दिवस सर्व नागा लोक, कुटुंबिय, जाती-जमाती, नातेवाईक याठिकाणी पुन्हा एकत्र येतील अशी त्यांची श्रद्धा होती, विश्वास होता.

मणिपूरमधील डोंगराळ भागातील पाचही जिल्हे बहुसंख्य नागा लोकांनी व्यापलेले आहेत. याला अपवाद फक्त चुराचंदपूर जिल्ह्याचा. कारण या जिल्ह्यात कुकी आणि मिझो जमातीचे लोक बहुसंख्येने राहतात आणि नागा लोक या जिल्ह्यात फार थोड्या प्रमाणावर राहतात. मणिपूर-म्यानमार सीमेवर असलेल्या पूर्वेकडील सबंध जिल्ह्यात तँगखुल जमातीचे लोक कुकी जमातीच्या छोट्या छोट्या समुहांबरोबर राहतात. उत्तरेकडील जिल्हे हे माओ, माराम, कोइरांग, ताराओ, थंगाल, चिरू आणि पाओमी नागांचे माहेरघर म्हणून गणले जातात. पश्चिमेकडील जिल्हे हे झेमी लिआ गमी, रोंगमी, झेलिअन ग्रँग आणि काबुइ नागांचे तर चंदेल जिल्हा हा एनल, लॅमकॅन्ग, मोयोन, मॅरिंग, छोटे नागा आणि थोड्या फार प्रमाणात विखुरलेल्या थाडोस (कुकी) जमातीने व्यापलेला आहे तर काही प्रमाणात काबुइ नागा आणि तँगखुल नागा इंफाळच्या खोऱ्यात आढळून येतात.

नागा लोकांची एक अशी भाषा नाही. प्रत्येक जमातीची स्वत:ची अशी वेगळी भाषा असून त्या प्रत्येक जमातीत देखील अनेक दुसऱ्या उपभाषा किंवा संपर्कभाषा आहेत. उदा. सर्व तँगखुल नागा गावांच्या वेगवेगळ्या संपर्कभाषा आहेत.

## कुकी

१८३० मध्ये नागा प्रदेशात कुकी लोकांची पहिली नोंद सापडते. १८३४ मध्ये म्यानमारच्या चिन डोंगरावरून कुकी लोक नागा प्रदेशात आले असण्याची शक्यता आहे. सन १८४० मध्ये मॅक कुलोक नावाच्या




एका ब्रिटिश राजकीय हस्तकाने मोठ्या प्रमाणावर कुकी लोकांना भरपूर शस्त्रास्त्रे आणि दारूगोळा देऊन नागांशी लढण्यासाठी नागाप्रदेशात आणले. थोड्याच कालावधीत हजारो कुकी लोक मणिपूरचाच एक भाग म्हणून स्थायिक झाले परंतु बहुसंख्य कुकी लोक आंतर जमातीय संघर्षात (म्यानमार) चिनी लोकांनी हाकलून दिल्यावर पहिल्या महायुद्धाच्या सुमारास मणिपूरमध्ये आले.

जेम्स जॉनस्टोन या ब्रिटिश राजकीय तत्त्ववेत्याने वर्णन केल्यानुसार बऱ्याच कालावधीपासून दक्षिणेला राहणारी कुकी ही अनेक जमातींनी बनलेली एक भटकी जमात आहे. १८३०-४० च्या सुमारास मणिपुरमध्ये ते कुकी या नावाने ओळखले जाऊ लागले तरी त्या वंशाचे अनेक लोक मणिपुरी राजाच्या अधिपत्याखाली होते. कुकी लोक नेहमी राजसत्तेला अनुकूल होते तर त्यांचे म्होरके वा नायक जुलमी होते. हे नायक कोणाचीही हत्या करायचे किंवा कोणाचीही फिकीर न करता, मत न अजमावता एखाद्याची गुलाम म्हणून विक्री करायचे. ते नागांपासून निश्चितच वेगळे ओळखू येतात आणि कुकी लोक धाडसी प्रवृत्तीचे आहेत.

कुकी जमातीत आपापसांत असलेल्या विरोधाभासांमुळे कुकी जमातीचे एखादे ठळक असे वैशिष्ट्य सांगता येणे कठिण आहे. पूर्वी हमार, सिम्ते, थाडोस, वायफी, गॅन्गती, पाइते, रालते यांचीदेखील गणना कुकी जमातीत केली जात होती परंतु आत्ता थोडासाच अपवाद वगळता इतरांची कुकी म्हणून गणना केली जात नाही.

कुकी म्हणजेच वर उल्लेखलेल्या सर्व जमाती ह्या चंदेल जिल्ह्याच्या उत्तर आणि दक्षिण भागात प्रामुख्याने आणि चुराचंदपूरमध्ये तुरळक आणि पूर्वेला उखरूल आणि पश्चिमेच्या तॅमन्गलाँग जिल्ह्यात वसलेल्या आहेत. कुकी जमात थोड्या फार तुरळक प्रमाणात डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या खोऱ्यातील थोबाल आणि बिष्णुपूर जिल्ह्यात विखुरलेली दिसून येते. कांगपोकपी जो उत्तरेकडील सेनापति जिल्ह्याचा उपविभाग आहे, तेथे मात्र कुकी जमातीची फार मोठी लोकसंख्या दिसून येते.

## नागांच्या राजकीय संघटना आणि त्यांचे सशस्त्र संघटन


राजकीयदृष्ट्या बघता प्रत्येक नागा जमातीची स्वत:ची अशी स्वतंत्र जमात-पंचायत आहे. या जमातपंचायती सामाजिक चालीरिती, जमिनीचे तंटे, ठराविक प्रश्न, समस्या यांवर विचारविनिमय करून निर्णय देत. स्वतंत्र नागा राज्याच्या लढ्यासाठी १९४६ मध्ये राजकीय पातळीवर नागा नॅशनल कौन्सिल

स्थापन करण्यात आली. नोव्हेंबर १९७५ मध्ये शिलाँग करार होईपर्यंत नागा नॅशनल कौन्सिल हिच एक नागा लोकांची प्रातिनिधिक राजकीय संघटना होती असे असले तरी नागा फेडरल गव्हर्नमेंट' (एन. एफ. जी.) नावाच्या एका भूमिगत संघटनेने या करारावर सही करून अनुमती दिल्याने मोठ्या प्रमाणावर नागा लोक या करारास एक विश्वासघातकी करार म्हणूनच या शिलाँग कराराचा उल्लेख करतात. वास्तविक पाहता १९५६ मध्ये नागा नॅशनल कौन्सिलनेच नागा प्रदेशात सार्वजनिक मतदान घेऊन नागा फेडरल गव्हर्नमेंटची एका स्वतंत्र राज्याचे सरकार म्हणून स्थापना केली होती. भारत सरकारने एन.एफ.जी. ला म्हणूनच बेकायदेशीर म्हणून घोषित केले होते. भारतीय सुरक्षा दले आणि एन.एफ. जी. चे भूमिगत सैन्य यांच्या अनेक वेळा चकमकी उडाल्या आणि त्यांत अनेकजणांना आपले प्राण गमवावे लागले. या शिलाँग कराराने केवळ भूमिगत स्वातंत्र्य चळवळीतच नव्हे तर नागांमध्ये आपापसातदेखिल दुफळी माजली.

या करारात नागा पुढाऱ्यांनी मान्य केल्याप्रमाणे, आम्ही सदर करार स्वखुषीने व विनाशर्त करत असून या करारान्वये आम्ही भारतीय राज्यघटनेचा स्वीकार करत आहोत तसेच आमच्या जवळची शस्त्रे आम्ही सरकारजमा करू तसेच सदर कालावधीत इतर आवश्यक विषयांकडे लक्ष पुरवून या विषयांवर अंतिम तोडगा काढू. या शिलाँग करारावर स्वाक्षरी करणाऱ्यांनी नागा नॅशनल कौन्सिलच्या प्रमुख नेत्यांशी जसे श्री. ए. झेड. फिझो, अध्यक्ष, श्री. थ. मुइव्हा, जनरल सेक्रेटरी आणि इसाक स्वू, उपाध्यक्ष यांच्याशी अजिबात चर्चा न करताच करारावर सह्या केल्या असा विरोधकांचा आरोप आहे. वरीलपैकी थ. मुइव्हा आणि इसाक स्वू यांनी या कराराला उघड विरोध करून मुख्य पक्षापासून अलग होऊन नॅशनल सोशॅलिस्ट कौन्सिल ऑफ नागालॅण्डची (एन. एस. सी. एन.) स्थापना केली. काही कालावधीतच एन. एस. सी. एन. ने नागा राष्ट्रवादाचा अवलंब करून सर्वात मोठ्या भूमिगत स्वातंत्र्य चळवळीचे स्वरूप धारण केले. मात्र १९८८ मध्ये या पक्षाला, पक्षात आधी दुफळी त्यांतच भ्रातृहत्या झाल्याने जबरदस्त हादरा बसला आणि त्याचा परिणाम पक्षाचे दोन तुकडे पडण्यात होऊन खपलांग एन. एस. सी. एन.आणि इसाक स्वू आणि थ. मुइव्हा यांची एन. एस. सी. एन. (आय. एम.) अशा दोन संघटना निर्माण झाल्या.

नजिकच्या काही वर्षातच एन. एस. सी. एन. (आय. एम.) हीच बलवान, प्रबळ अशी एक अतिरेकी नागा राष्ट्रवादी लोकांची चळवळ म्हणून पुढे आली. १९९२-९३ पर्यंत सर्व नागा राहात असलेला प्रदेश अगदी अरूणाचल प्रदेशमधील तिराप जिल्ह्यापर्यंत या संघटनेच्या प्रभावाखाली आला. १९९३ मध्ये एन. एस. सी. एन. (आय. एम.) प्रतिनिधित्व न मिळालेल्या राज्यांच्या आणि लोकांच्या संघटनेचा प्रतिनिधित्व नसलेले राष्ट्र आणि लोकांची संघटना (यु. एन. पी. ओ.) चा सभासद झाला. आणि याबरोबरच एन. एस. सी. एन. (आय. एम.) ला बरीच आंतरराष्ट्रीय प्रसिद्धीही मिळाली. स्वतंत्र नागा राज्याची यु.एन.पी.ओ. मध्ये सभासद म्हणून नोंद झाल्याच्या आनंदाप्रित्यर्थ २५ मार्च १९९३ हा दिवस 'कृतज्ञता दिन' म्हणून नागा बहुसंख्य असलेल्या भारतातील प्रदेशात आणि म्यानमारमध्ये साजरा केला जातो.

या दरम्यानच्या काळात १९९० मध्ये ए. झेड फिजोच्या मृत्युनंतर नागा नॅशनल कौन्सिलच्या ज्या गटाने १९७५ च्या शिलाँग कराराला विरोध केला होता, त्या गटाचे पुढे दोन गट झाले. एकाचे प्रतिनिधित्व ए. झेड फिजोच्या मुलीने, ॲडिनो फिजोने केले तर दुसऱ्या गटाचे प्रतिनिधित्व फिजोचा आयुष्यभराचा साथीदार खोदाओ हा करीत होता. खोदाओ गटाने नुकत्याच प्रसृत केलेल्या निवेदनानुसार एन.एस.सी.एन. (आय.एम.) हीच सर्व नागा लोकांचे खरेखुरे प्रतिनिधित्व करणारी एकमेव राजकीय संघटना होय.



## कुकी जमातीच्या राजकीय संघटना आणि त्यांचे सशस्त्र संघटन

कुकी नॅशनल ऑर्गनायझेशनचे (के.एन.ओ.) अध्यक्ष आणि कुकी नॅशनल आर्मीचे (के.एन.ए.) सर्वोच्च पदाधिकारी असलेल्या श्री. हेन्गलीन यांच्या दाव्यानुसार सदरची संघटना ५ ऑगस्ट १९४७ ला स्थापन करण्यात आली पण बऱ्याच गोष्टींमुळे सदर संघटना नुकतीच स्थापन झाली असावी असे स्पष्टपणे दिसून येते. असे असले तरी 'कुकी नॅशनल असेंब्ली' या राजकीय संघटनेची स्थापना मात्र १९४७ लाच करण्यात आली होती. आणि सदर संघटना राज्याच्या निवडणुक कामकाजात 'राजकीय पक्षाची' भूमिका पार पाडत आहे.

इन्पी ही कुकी लोकांची काळजी वाहणारी आणखीन एक राजकीय संघटना आहे. अनेक वर्षांपासून मृतवत असलेली ही संघटना सध्या नव्या जोमाने कार्य करत आहे. त्यांचे प्रमुख कार्य कुकी निर्वासितांचे सामाजिक पुनर्वसन करणे हेच होय.

गेल्या एका वर्षभराच्या कालावधीत अनेक नवनवीन कुकी लष्करी गटांची स्थापना करण्यात आली आहे. आजपर्यंत उदयास आलेल्या किंवा स्थापन झालेल्या अनेक डझनवार संघटनांपैकी काही पुढीलप्रमाणे कुकी नॅशनल आर्मी के. एन. ए. कुकी नॅशनल फ्रंट के. एन. ओ. कुकी कमांडो फोर्स के. सी. एफ. कुकी फ्रंट कौन्सिल के. एफ. सी. कुकी डिफेन्स फोर्स के. आय. ए. चीन-कुकी रिव्होल्युशनरी फोर्स. वरीलपैकी बऱ्याच संघटना कुकी स्वतंत्र भूमीच्या मागणीसाठी लढत असल्याचे चित्र दिसत असले तरी या मागणीबाबत त्यांच्यात एकवाक्यता दिसून येत नाही कारण के. एन. ओ.आणि के. एन. ए. या एका स्वतंत्र्य राज्याच्या मागणीची पूर्तता म्यानमारचे विभाजन करून व्हावी या

मताचे आहेत तर के. एन. एफ. आणि के. डी. एफ. च्या मागणीनुसार स्वतंत्र राज्य संपूर्ण चंदेल जिल्हा, आग्नेयेकडचा उखरूल जिल्हा, सेनापति जिल्ह्यातील सरदिर टेकड्यांचा काही प्रदेश, उत्तर पूर्वेकडचा तॅमेन्गलाँग जिल्ह्याचा काही भाग, चुराचंदपूर जिल्ह्याचा काही भाग, इंफाळ, बिष्णुपूर, आणि थोबाल जिल्ह्याचा काही खोऱ्यातील भाग आणि कुकी राहत असलेले नागालँड आणि आसाममधले काही भाग यांनी मिळून बनलेले असावे.

काही बातमीपत्रांनुसार कुकी अतिरेरक्यांना मोठ्या प्रमाणावर प्रशासकीय यंत्रणेद्वारे मणिपूर राज्याचा आणि केंद्र सरकारचा नैतिक पाठिंबा मिळत आहे. ८ सप्टेंबर, ९३ मधील 'द हिंदू' मधील बातमीत म्हटल्याप्रमाणे कुकी नॅशनल ऑर्गनायझेशनचे अध्यक्ष असलेल्या श्री. हेन्गलीन यांनी आपण सेनाधिकारी एस. एफ. रॉड्रिग्ज यांना २४ डिसेंबर ९२ ला दिल्लीत मणिपूरातील अनेक अधिकारी आणि संस्थांच्या आपण सतत संपर्कात आहोत असा दावा केला.

सध्याचे मणिपूरचे मुख्यमंत्री, श्री. आर. के. दोरेन्द्रसिंगानी कुकी फेडरल गव्हर्नमेंटला १ लाख रूपये दिले असून, मणिपूरचे अर्थमंत्री, श्री. दाऊन्गेल यांनी देखील चीन कुकी रिव्होल्युशनरी फ्रंटला दोन लाख रूपये दिल्याचे मानले जात आहे ( २७ ऑक्टोबर, १९९२ च्या टेलिग्राफच्या बातमीनुसार)

२२ जुलै, १९९३ च्या हिंदुस्थान टाइम्समधील बातमीपत्रानुसार कुकी नॅशनल आर्मीने भारतीय गुप्तचर संघटनेकडे म्हणजेच 'रॉ' कडे ७ करोड रूपये आणि भारतीय लष्कराकडून एन. एस. सी. एन. शी अंतिम युद्ध लढण्यासाठी हत्यारे आणि इतर साधनसामुग्रीची मागणी केली आहे.

## कुकी नागांच्या चकमकी

१९९२ च्या मध्यापासून कुकी आणि नागांच्या आपापसात चकमकी होत आहेत. या चकमकीत नागा व कुकींची शेकडो घरे जाळली गेली, कित्येक गावे उध्वस्त केली गेली. हजारो लोक निर्वासित झाले तरीही जीवित आणि वित्तहानी अजूनही होतच आहे.

भारत आणि म्यानमारच्या सीमेवर असलेल्या मोरहे शहरातच १९९२ च्या मे महिन्यात चकमकींना सुरूवात झाली. मोरहे हे मणिपुरमधल्या चंदेल जिल्ह्यात मोडते. या ठिकाणच्या गावातील कुकी लोकांनी आम्ही नागा राष्ट्रवादाला मान्यता दर्शविणार नाही अशी भूमिका घेऊन एन. एस. सी. एन. ला कर रूपाने वर्गणी देण्यास नकार दिला आणि तिथेच पहिली ठिणगी पडली. वास्तविक पहाता अगदी आरंभापासून सदरील वर्गणी एन. एस. सी. एन. प्रत्येक घरामागे गोळा करत असे. नागा लोक ही वर्गणी स्वखुषीने देत तर वरील घटना घडेपर्यंत कुकी लोक देखील ही कररूपी वर्गणी देत होते. नंतर मात्र मोरहे भागातील कुकी खेडूतांनी एन. एस. सी. एन. ला वरील कर देणे थांबविण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय घेण्यास त्यांना कोणी उद्युक्त केले हे जरी कळले नसले तरी या निर्णयाने कुकी लोक एन. एस. सी. एन. शी संघर्ष करण्यास तयार असल्याचे स्पष्ट झाले.

कुकी नॅशनल आर्मी आणि कुकी फेडरल कौन्सिल या संघटना कुकी लोकांनी वर उल्लेखलेला कर एन. एस. सी. एन. ला कदापिही देऊ नये यासाठी प्रयत्नशील होत्या अशा बातम्या आहेत. तसेच कुकी लोकांनी केलेल्या तक्रारीनुसार एन. एस. सी. एन. ही नागा लोकांकडून दिल्या जाणाऱ्या करापेक्षा जास्त कर कुकी लोकांनी द्यावा म्हणून जबरदस्ती करीत होती. जादा कर न देणाऱ्या कुकी लोकांना एन. एस. सी. एन. हुसकावून लादण्याच्या धमक्या देत होती असाही दावा कुकी लोकांनी केला. यावरून एन. एस. सी. एन. आणि कुकी सशस्त्र संघटना मोरहे भागात काही काळ सक्रिय होत्या हे स्पष्ट होते.

३ जून १९९२ रोजी मोरहे शहराजवळ झालेल्या एन. एस. सी. एन. आणि के. एन. ए. यांच्या गोळीबारात

ऑन खोलेत हाओकिप हा कुकी जमातीचा माणूस मारला गला. के. एन. ए. च्या मतानुसार तो एक निष्पाक खेडूत होता तर एन. एस. सी. एन. ने केलेल्या दाव्यानुसार तो के. एन. ए. चा एक स्वयंसेवक सैनिक होता. या घटनेनंतर आलेल्या अनेक बातम्यांनुसार मोरहे भागातील आणि आसपासच्या अनेक नागा लोकांचे के. एन. ए. ने अपहरण करून त्यांचा बेसुमार छळही केला. अनेक जण या प्रकारात मारले गेले. कित्येक नागा खेडूतांना के. एन. ए. ने पाठवलेल्या गाव सोडून जाण्याच्या धमकीपत्राला तोंड द्यावे लागले. अनेक नागा खेडूतांनी त्यांच्याजवळचे पैसे के. एन. ए. नी जबरदस्तीने काढून घेतल्याचा दावा केला. अखेर ९ जून १९९२ ला चंदेल जिल्ह्याच्या पोलिस अधिक्षकांनी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी मोरहे भागाला भेट दिली. तसेच १४ जून १९९२ रोजी उपमुख्यमंत्री श्री. रिशँग किशिंग यांच्या नेतृत्वाखालील मणिपूरच्या मंत्रिमंडळाच्या सदस्यांच्या शिष्टमंडळाने देखिल या भागाला भेट देऊन दोन्ही जमातींना शांतता राखण्याचे आवाहन केले. मात्र श्री. किशिंग यांनी आयोजित केलेल्या सभेला सर्व प्रमुख कुकी नेते अनुपस्थित राहिले. कुकी अतिरेक्यांकडून होणाऱ्या संभाव्य हल्ल्याला तोंड देण्यासाठी अखेर राज्य सरकारने खबरदारीचा उपाय म्हणून मणिपूर रायफल्सच्या तुकड्या मोरहे भागातील नागा खेड्यात तैनात केल्या. पण तरीही हिंसाचार चालूच राहिला.

मणिपूरमधील सर्व जात आणि जमातींच्या विद्यार्थी संघटनेतील प्रतिनिधी १८ जून १९९२ ला एकत्र भेटले व त्यांनी मोरहे भागात एक सदिच्छा शिष्टमंडळ पाठविण्याचा निर्णय घेतला वरील. विद्यार्थ्यांचा निर्णय घेतला वरील विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाने २० आणि २२ जून १९९२ या तीन दिवसाच्या कालावधीत इंफाळमध्ये अदिवासी मंत्र्यांची भेट घेतली. मोरहे भागाला भेट देऊन शांततेसाठी सार्वजनिक सभांचे आयोजन केले पण दुर्देवाने कुकी नॅशनल आर्मी आणि कुकी फेडरल न्सिल या भारत आणि म्यानमार कुकी संघटनांनी मोरहे भागातील हिंसाचाराचे प्रमाण वाढवले. ४ जुलै, ९२ ची उपमुख्यमंत्र्यांची मोरहे भागाची दुसरी भेट देखिल शांतता प्रस्थापित करण्यात अयशस्वी ठरली आणि अखेर १३ जुलै १९९२ पासून मोरहे भागातून नागा रहिवाशांचे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर सुरु झाले.

नागा खेडूतांनी राज्य सरकारला अनेक निवेदने, अर्ज, स्मरणपत्रे देऊन आपली जीवित आणि वित्त हानी होण्यापासून रक्षण करण्याची विनंती केली तरीदेखिल सुरुवातीला हा वांशिक हिंसाचार रोखण्यासाठी राज्य सरकारने कोणतीही पाऊल उचलली नाहीत. उलटपक्षी मणिपूर सरकारातील ज्येष्ठ पुढाऱ्यांनी पक्षपाती भूमिका घेऊन काही निवेदने प्रसृत केली व त्यामुळे दोन्ही बाजूंच्या भावना दुखावल्या गेल्या. मुख्यमंत्री आणि अर्थमंत्री यांनी कुकी अतिरेक्यांना आर्थिक मदत केल्याच्या बातम्यांमुळे आधीच तंग असलेले वातावरण स्फोटक बनले आणि भारतीय सैन्यदल आणि 'रॉ' कुकी अतिरेक्यांना 'प्रतिदहशतवादी' म्हणून एन. एस. सी. एन. विरूद्ध वापरत आहेत. यासारख्या बातम्यांमुळे भारत सरकार नागा लोकांवर कुकींच्या मदतीने सूड उगवत असल्याची भावना सर्व नागा लोकात दृढ होऊ लागली.

या परिस्थितीच्या कचाट्यात सापडल्याने नागा खेडूतांनी स्वत:च आत्मसंरक्षणासाठी सिद्ध व्हायचे ठरविले आणि गाव रक्षणासाठी गाव संरक्षण दलाची स्थापना केली आणि यामुळे चकमकी शेजारच्या उखरूल, तॅमेन्गलाँग, सेनापति आणि चुराचंदपूर जिल्ह्यात पसरल्या. के. एन. ए. के. एस. सी. आणि इतर कुकी संघटना वरील जिल्ह्यात जास्त सक्रिय होत्या. नागांनीदेखील तॅमेन्गलाँग, सेनापति आणि उखरूल जिल्ह्यातील कित्येक कुकी खेड्यांवर हल्ला केला. या नागा कुकींच्या चकमकींचे लोण हळूहळू शेजारच्या राज्यात नागालँण्डमध्ये तसेच मुख्यत: पेरेन

उपविभागात पोहोचले. या चकमकीत नागा भूमिगत संघटनेचा सहभाग असण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरीदेखिल एन. एस. सी. एन. आय. एम. ने या चकमकीत आपला हात असल्याचा इन्कार केला आहे. विशेषत: तॅमेइ उपविभागातील झूपी खेड्यातील घटनेचा. या घटनेत सुमारे ३५निष्पाप कुकी लोकांची गोळ्या घालून हत्या केली. व या भागातील नागा खेड्यांवर झालेल्या हल्ल्यांचा सूड घेतला. नागांच्या कत्तलीला आणि कुकींच्या हल्ल्याला प्रतिबंध करण्यासाठी 'एक संरक्षणात्मक चाल' असे म्हणून नागा लोक कुकी खेड्यांवरील हल्ल्याचे समर्थन करतात. १९९३ च्या संबंध वर्षभर हल्ले-प्रतिहल्ले चालूच राहिले. दोन्ही बाजूचे अनेक लोक या कालावधीत मृत्युमुखी पडले.

जादा लष्करी कुमक पाठविण्यापलिकडे राज्य सरकारने याप्रसंगी काही केले नाही. सप्टेंबर ९३ मध्ये केंद्र सरकारने वाढीव मदत म्हणून ५ कोटी रूपये मणिपूर पोलिस खात्याचे आधुनिकीकरण करण्यासाठी तसेच साडेसहा कोटी रूपये राखीव पोलीस दलाची आणखी एक तुकडी वाढविण्यासाठी राज्य सरकारला दिले. डोंगराळ भागातील एन. एस. सी. एन. बंडखोरांशी लढण्यासाठी सैन्यदलाच्या पाच तुकड्या हवाई मार्गाने मणिपूरमध्ये पाठवल्या. तसेच निमलष्करी दलाच्या आणखीन तीन तुकड्या मणिपूरच्या खोऱ्यातील आणि इतर भागातील वांशिक हिंसाचार रोखण्यासाठी धाडण्यात आल्या.

सैन्य दलाची आघाडी वाढविण्याचे तसेच शेकडो हजारो सुरक्षा सैनिकांना तैनात करण्याचे आणि लष्करी दलांना विशेष अधिकार देणारा कायदा तसेच अशांत प्रदेशाचा कायदा आणि इतर सर्व राक्षसी कायद्यांचा सतत होणारा वापर या सगळ्या गोष्टी अंमलात येण्यामागे, सतत चालू असलेला दोन भिन्न जमातींचा संघर्ष हेच कारण वारंवार सांगितले जाते.

मोठ्या संख्येने सैन्यदले मणिपुरमध्ये पाठवून या समस्येची उकल होणार नाही हे स्पष्टच आहे.

सशस्त्र दलांच्या भेदाभेद करून वागण्याच्या पद्धतीमुळे नागा आणि कुकी लोकांत अविश्वासाची भावना जास्त गडद झाली. एकीकडे राज्य सरकारचा आदेश मानून नागा लोकांकडची परवानाप्राप्त शस्त्रे काढून घेऊन तसेच एकंदरितच सर्व नागा जमातीला आणि एन. एस. सी. एन. ला दुर्लक्षित केले तर दुसरीकडे उघडपणे शस्त्र घेऊन फिरणाऱ्या कुकी लोकांकडे कानाडोळा केला व कुकींवरील अत्याचाराच्या घटनादेखिल नगण्यच होत्या. ही सापत्नभावाची वागणूक होती. खास करून काही प्रकरणात. उदाहरणार्थ चंदेल जिल्ह्यातील मेरिंग खेडूतांना आसाम रायफल्सच्या झडतीसत्रानंतर लगेचच कुकींच्या हल्ल्याला तोंड द्यावे लागले.

अशा प्रकारच्या निष्ठूर आणि भेदभावाच्या वागणुकीमुळे सैन्य दलाने दोन जमातीत केवळ संशयाचे दाट धुकेच निर्माण नाही केले तर प्रत्यक्ष अतिरेक्यांनाच दहशतवाद वाढविण्यासाठी फूल दिली. या आणि यांचे प्रत्यंतर सैन्य दलाला लवकरच आले. २९ जून ९३ ला एन. एस. सी. एन. ने दबा धरून आसाम रायफल्सवर केलेला हल्ला हे दहशतवादाचे उत्तम उदाहरण आहे. सध्याचे मणिपूरचे राजकीय नेतृत्व अपयशी होणे हे साहजिकच होते.

मणिपूर आणि नागालँड या दोन छोट्या राज्यांची ३१ लाख लोकसंख्या विचारात घेता या राज्यातील लोकांना दरडोई विकास कामांवरचा खर्च सर्वाधिक दिला गेला आहे. या राज्यांचे वार्षिक अंदाजपत्रक सुमारे १००० कोटी रूपयांचे असते. ही भरपूर आर्थिक मदत लक्षात घेऊन विकासाची पाहणी केली असता तो अत्यल्प असल्याचे ठळकपणे दिसून येते आणि यावरूनच ही मदत जनतेपर्यंत न पोहोचता या राज्यातील राजकीय नेतृत्वाच्या आणि अधिकाऱ्यांच्या


(पान ३० वर)

# नागालँडमधील आदिवासी जमाती – भाग १

**– पुरूषोत्तम आगाशे**

ईशान्य भारत, मुख्य भारत भूमीपासून काहीसा तुटलेला भाग. संपर्क, दळणवळण साधनांच्या अभावामुळे दुर्लक्षिला गेल्याने तिथे असंतोष नेहमी खदखदत असतो. आसाममधील बोडोलँडचा प्रश्न असो वा चकमा निर्वासितांचा, मणिपूरमधील नागा, कुकी संघर्ष तसेच इतर अनेक जमातींचे प्रश्न वृत्तपत्रातून आपले लक्ष वेधून घेत असतात. इथे असलेली सात राज्ये भौगोलिक दृष्ट्या महत्त्वाची. कारण त्यांच्याभोवतीने बांगलादेश, भूतान, म्यानमार (बर्मा) व चीन यासारखे देश वसले आहेत. ईशान्य भारतातील ही राज्ये म्हणजे निसर्गाने दिलेले वरदानच म्हटले पाहिजे. स्वर्गीय सौंदर्याने नटलेल्या या डोंगराळ प्रदेशात अनेक आदिवासी जमाती आढळून येतात. मानववंश शास्त्रज्ञ व इतर सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासकांच्या दृष्टीने तर हा भाग म्हणजे संशोधनाची खाणच आहे. अशाच एका राज्यातील आदिवासी जमातींची ही ओळख.

नागालँड भारतातील दुसऱ्या क्रमांकाचे छोटे राज्य. केवळ १६,५९७ चौ. कि.मी. क्षेत्रफळ असलेल्या नागालँडच्या पश्चिम सीमेला आसाम, दक्षिणेला मणिपूर, पूर्वेला म्यानमार (बर्मा) तर उत्तरेला अरूणाचल प्रदेश आहे. नागालँडचा बहुतांशी भाग डोंगराळ प्रदेशाने व्यापलेला आहे. दिमापूर, नागिनामारा, ताजित यासारखे पठारी भाग तसेच गास्पिनी, बाघटी व भंडारी नद्यांच्या खोऱ्याचा प्रदेश याला अपवाद आहे. कोहिमा, नागलँडची राजधानी



४८०० फूट उंचीवर वसलेली आहे. इथली गावे टेकड्यांवरच वसलेली आढळतात. आदिवासी घरे जमातींमध्ये शत्रूच्या हल्याची पूर्वकल्पना यावी व लढता यावे म्हणून अशी बांधण्याची प्रथाच पडलेली आहे.

नागालँडमध्ये रेल्वेमामार्गाचे फारसे जाळे नाही. आता रस्त्यांचे जाळे सर्वदूर पसरू लागले आहे. १८७३ मध्ये ब्रिटिश राजवटीमध्ये नागालँडच्या पठारी प्रदेशातून डोंगराळ प्रदेशात जाण्यावर बंधने घालण्यात आली. इतर भारतीयांना नागा डोंगराळ भागात येण्यावर तसेच ब्रिटीश चहा मळेवाल्यांचे आर्थिक हित जपण्यासाठी आंतररेखा परवाना देण्यास सुरूवात केली गेली. या निर्बंधानुसार, परवान्याशिवाय कोणाही बाहेरच्या नागरिकास दिमापूरच्या पुढे जाण्यास बंदी घालण्यात आली.

आंतररेखा परवान्यामुळे नागालँडमधील आदिवासी जमातींचे तसेच पठारी प्रदेशातील लोकांचे हक्क अबाधित राहिले आहेत. कारण त्यामुळे तेथील आदिवासींच्या जमिनीवरचे अतिक्रमण टळले. तसेच इतर लोकांच्या हल्ल्यापासून त्यांना संरक्षण मिळू लागले. स्वातंत्र्यानंतर आंतररेखा निर्बंधामुळे स्थानिक आदिवासी जमातींचे बेकायदेशीरपणे घुसू पहाणाऱ्या सावकार व अकुशल कामगारांमुळे होऊ शकणारे शोषण थांबवता आले. तसेच आदिवासी संस्कृतीचे देखील वैशिष्ट्य टिकून ठेवता आले. भारतातील हौशी पर्यटकांवर मात्र हा कुठलाही नागरिक पर्यटनासाठी तेथे विनापरवाना जाऊ शकतो. परवाना घेण्याचे बंधन नाही.


१९८२च्या आकडेवारीनुसार नागालँडचा ८०९५ चौ.कि.मी. प्रदेश जंगलांनी व्यापलेला आहे. साहजिकच नागा लोक स्थलांतरित शेतीचाच अवलंब करतात. डोंगर उतारावरची जमीन निवडून तेथील झाडे तोडली जातात. झाडांचे उरलेले बुंधे जाळून शेतीसाठी जमीन तयार केली जाते. जमिनीची नांगरणी न करता त्यावर नैसर्गिक पद्धतीने शेती केली जाते. सर्व जमातीसाठी मिळून त्यावर सामुदायिकपणे पिके घेतली जातात. काही वर्षानंतर ती जागा सोडून देऊन दुसरीकडे जमीन शोधली जाते. मात्र आता सरकारच्या प्रोत्साहनामुळे लोक आता एका जागी स्थिर राहून शेती करू लागले आहेत.

## प्रशासन : ऐतिहासिक आणि राजकीय पार्श्वभूमी :


१८३२ मध्ये मणिपूरमधून आसाममध्ये जाताना ब्रिटिशांनी नागा डोंगराळ प्रदेशात प्रवेश केला. १८३९ ते १८४६ दरम्यान ब्रिटिशांनी इथे आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी प्रशासनाची घडी बसवण्याचा प्रयत्न केला. मात्र मनुष्यबळ, पैसा, व दळणवळण साधनांच्या अभावी हा निर्णय पुढे ढकलण्यात आला.

१८६६ मध्ये नागा जमातीचे प्राबल्य असलेल्या भागाचा नागा डोंगरी जिल्हा स्थापन करण्यात आला व त्याचे मुख्यालय समागुतिंग येथे ठेवण्यात आले. जिल्ह्याचे प्रशासन पहाण्यासाठी उपायुक्त नेमणूक करण्यात आली. त्यानंतर जिल्हा मुख्यालय काही काळासाठी वाखा येथे तर तीन वर्षानंतर कोहिमा येथे स्थलांतरित करण्यात आले.

१८८१ मध्ये हा 'मागास' जिल्हा एका अध्यादेशाद्वारे आसामला जोडण्यात आला व मुख्य आयुक्तांची कारभार पहाण्यासाठी नेमणुक करण्यात आली. तुएनसंग प्रभाग मात्र यातून वगळण्यात आला. पुढे १९०५ मध्ये हा जिल्हा पूर्व बंगालला जोडण्यात आला. त्यानंतर पुन्हा १९१२ मध्ये आसामचा भाग म्हणून त्याला मान्यता दिली गेली. १९२९ मध्ये 'सायमन कमिशनने' या भागास भेय दिली. १९३० मध्या नागा जमातींनी ब्रिटिश सरकारविरूद्ध 'जादुनाग' च्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्यासाठी बंड पुकारले. जादुनांगला फासावर लटकवल्यानंतर देखील 'राणी



थिमचुंगर शाल



अंगामी शाल

गायदिदिलऊ' च्या नेतृत्वाखाली लढा चालूच राहिला. १९३५ मध्ये नागा डोंगरी जिल्ह्याला 'वगळलेले क्षेत्र' म्हणून जाहीर करण्यात आले. केंद्रीय किंवा प्रांतिय मंडळाचे कुठलेही कायदे या क्षेत्राला लागू होणार नाहीत अशी व्यवस्था करण्यात आली व जिल्ह्यामध्ये शांतता व सुव्यवस्था राखण्याचे सर्व अधिकार आसामच्या राज्यपालांना देण्यात आले.

१९१८ मध्ये नागा क्लबची सरकारतर्फे स्थापना करण्यात आली. या क्लबमध्ये सरकारी अधिकारी व गावप्रमुख एकत्र येऊन आदिवासींच्या विविध समस्यांबद्दल चर्चा करत. मात्र नियमितपणाच्या अभावी हे काम मागे पडले. त्यानंतर १९४५ मध्ये तत्कालिन उपायुक्त श्री. पावसी यांना नागा डोंगरी जिल्हा आदिवासी परिषदेची स्थापन केली. १९४६ मध्ये ही परिषद बरखास्त करून 'नागा राष्ट्रीय परिषद' (एन.एन.सी.) स्थापना करण्यात आली. २९ सदस्य असलेल्या या परिषदेचा उद्देश नागा जमातींसाठी कल्याणकारी कामे करणे हा होता.

१९५० मध्ये नागा डोंगरी जिल्हयाचा संविधानाच्या ६ व्या शेड्यूलप्रमाणे स्वायत्ततेचा दर्जा देण्यात आला. आणि इथल्या लोकांना आसाम विधानसभेमध्ये प्रतिनिधीत्व देण्यात आले. नागा राष्ट्रीय परिषदेला कर आकारणी व कर जमा करण्याचे अधिकार देण्यात आले. मात्र परिषदेला हे मान्य नव्हते. त्यामुळे जिल्हा परिषद तसेच १९५२ साली झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत नागा जमातींनी भाग घेतला नाही. मार्च १९५६ मध्ये भूमिगत नागांनी भारतातून फुटून निघून स्वतंत्र राष्ट्र स्थापन करण्याच्या आशेने अनधिकृतपणे नागा केंद्रीय सरकारची स्थापना केली.

१९५७ मध्ये नागा डोंगरी जिल्हा आसामपासून वेगळा करण्यात आला. तसेच तुएनसंग प्रातिक विभाग उत्तर पूर्व प्रांतापासून वेगळा करण्यात आला आणि नागा डोंगरी, तुएनसंग क्षेत्र (एन.एच.टी.ए.) हा नवीन प्रशासकीय विभाग अस्तित्वात आला. मोकोकचुंग आणि कोहिमाप्रमाणेच तुएनसंग हा नवीन जिल्हा एन.एस.टी.ए. मध्ये तयार करण्यात आला.

१९५७ मध्ये कोहिमा येथे तर १९५७ मध्ये उंगामा येथे नागा लोकांचे संमेलन भरले. १९६० मध्ये नागा लोकांच्या प्रतिनिधींनी १६ कलमी मागण्या तत्कालीन पंतप्रधान श्री. पंडित जवाहरलाल नेहरूंना सादर केल्या. १९६० मध्ये पंतप्रधानांनी नागा लोकांसाठी स्वतंत्र्य नागालँड राज्य स्थापन केल्याची घोषणा केली. नागालँड हे भारतातील सोळावे राज्य ठरले. राज्यपालांना सल्ला देण्यासाठी पाच निर्वाचित सदस्यांचे सल्लागार मंडळ तयार करण्यात आले.

## ग्राम आणि आदिवासी परिषद :

नागालँडमध्ये प्रत्येक गावासाठी ग्रामपरिषद तसेच प्रत्येक जमातीसाठी जमात परिषद असते. प्रशासनाची घडी बसल्यानंतर नागालँड सरकारने दुभाषी हे पद निर्माण केले. सरकारी अधिकारी व आदिवासी जमातीच्या लोकांमध्ये सुसंवाद साधण्याचे काम दुभाष्याला करावे लागते. हे काम नागामिझ (आसामिझ भाषेपासून निर्माण झालेले रूप) या भाषेत चालते. दुभाषी हे सरकारी नोकर असतात. व त्यांना सरकारतर्फे नियमित वेतन तसेच लाल लोकरीची शाल दिली जाते.

गाव बुऱ्हा हे ब्रिटिशांच्या काळापासून चालत आलेले पद देखील नागालँड सरकारने पुढे चालू ठेवले आहे. गाव बुऱ्हांची निवड सरकारकडून होत असली तरी ते सरकारी नोकर नव्हेत. त्यांना सरकारतर्फे दरवर्षी लोकरीची लाल शाल दिली जाते. या पदाला अनेक अधिकार असतात. व गावामध्ये हे पद मानाचे समजले जाते. गाव बुऱ्हा हे गावाचे प्रमुख असतात. आणि सरकार व गावकरी यांच्यातला दुवा म्हणून काम करतात. प्रत्येक गावासाठी एक मुख्य गाव बुऱ्हा असतो. त्याला प्रत्येक खेलचे (गावाच्या एका भागामध्ये रहाणाऱ्या कुळाचे) प्रतिनिधीत्व करणारे सहाय्यक गाव बुऱ्हा असतात. काही आदिवासी जमातींमध्ये गावाच्या प्रमुखाला दोन प्रकारची कामे मुख्यत्वेकरून करावी लागतात. एक म्हणजे गावचे दैनंदिन कामकाज पहाणे व गावाचे संरक्षण आणि दुसरे म्हणजे धार्मिक सण व समारंभ यांचे आयोजन करणे. गावामध्ये शांतता राखण्याची व उत्कर्ष करण्याची जबाबदारी गावप्रमुखावरच असते. जेव्हा धार्मिक कार्य चालू असते. त्यावेळेस गावप्रमुखाची उपस्थिती अत्यंत आवश्यक असते. तसेच गावाच्या सर्व सणसमारंभामध्ये असेल त्यावेळेस 'जेन्ना' (काही प्रकारचे निर्बंध) पाळला जातो. जेन्नाची तारीख गावातील पुजारी ठरवितो. प्रत्येक गावाचा तसेच आदिवासी जमातीचा वेगवेगळा जेन्ना असतो.

ग्रामपरिषदेमार्फत वेगवेगळ्या प्रकारचे भांडणतंटे सोडवले जातात. १. दोन व्यक्तींमधील खासगी भांडणे तसेच सार्वजनिक झगडा २. बाजार, पाणीपुरवठा, पदपथ, आर्थिक बाबी, यासारखे प्रशासकीय विषय. ३. चोरी, खून, घटस्फोट यासारखे विषय. हे सर्व भांडणतंटे ग्राम न्यायालयाच्या कायद्याप्रमाणे सोडवले जातात दुभाषींना किरकोळ तंटे सोडवण्यासाठी काही अधिकार दिले जातात. पारंपारिक नागा गावामध्ये जो कोणी सर्वात जास्त लोकांना मेजवानी देऊ शकेल अशा लोकांकडे गावचे पुढारीपण जात असे. बुजुर्ग मंडळींच्या ग्राम परिषदेला आता 'पंचायत' असे म्हणतात.

नागालँडमधील लोकांच्या समाजजीवनावर ग्रामपरिषदेचा बराच प्रभाव आहे. १९४५ च्या कायद्यानुसार गुन्हेगारांविरूद्ध खटले चालवण्याचे तसेच त्यांना दंड करण्यचो अधिकार आदिवासी जमात परिषदेला आहेत. न्यायनिवाडा करून प्रचलित असलेल्या कायद्यानुसारच शिक्षा, दंड दिला जातो. अगदी क्वचितच गुन्हेगाराला अत्यंत कठोर अशी शिक्षा दिली जाते.

## साक्षरता

ब्रिटिश राजवटीमध्ये ख्रिश्चन धर्मगुरूंनी नागा लोकांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करण्याकरता, रूजवण्याकरता अपार मेहनत घेतली. त्यावेळेच्या सरकारनेसुद्धा शाळा काढण्याकरता मदत दिली. मात्र स्वांतत्र्यप्राप्तीनंतरच नागालँडमध्ये शिक्षणाचा ४२ टक्के लोक साक्षर होते. त्यापैकी ४९ टक्के पुरुष तर ३२ टक्के महिला होत्या.

## आदिवासी जमाती

नागालँडमध्ये अनेक जमाती व उपजमाती आहेत. त्यांनी आपल्या परंपरा, भाषा याद्वारे आपले स्वतंत्र्य अस्तित्व टिकून ठेवले आहे. नागालँडच्या एकूण लोकसंख्येच्या ८४ टक्के लोक आदिवासी आहेत. इथल्या मुख्य जमाती व त्यांची वस्तीस्थाने पुढीलप्रमाणे :

| जिल्हा | मुख्यालय | मुख्य जमात |
|---|---|---|
| कोहिमा | कोहिमा | अंगामी, झेलिअनग्राँग, कुकी |
| फेक | फेक | रेंगमा, चाखेसांग |
| बारवा | बारवा | लोथा, सेमा |
| सुन्हेबोटो | झुन्हेबोटो | सेमा |
| मोकोकचुंग | मोकोकचुंग | आओ |
| तुएनसंग | तुएनसंग | कोन्याक, चांग, संगताम |
| माँग | मॉन | कोन्याक, फोम |

याशिवाय खियामुंगन, पोचुरी, यिमचुंगर या आदिवासी जमातीदेखील आढळतात.

## व्यवसाय :

नागालँडमध्ये बहुतांशी लोक शेती हाच व्यवसाय करतात. स्थानांतरित शेतीचे प्रमाणही बरेच आढळून येते. काही आदिवासी जमाती कापणीसाठी विळ्याचा वापर करतात. सेमा जमातीत मात्र परंपरेप्रमाणे अजून ही हातांचाच वापर केला जातो. याशिवाय नागा जमाती इतर वेळेस विणकाम, लोहारकाम, लाकडावरचे कोरीव काम यासारख्या हस्तकौशल्यामध्ये व्यस्त असतात. मात्र या वस्तू केवळ स्वत:च्या वापरासाठीच तयार केल्या जातात. व्यावहारिकतेचा त्यांच्यामध्ये अभाव आढळून येतो. हातमागावर तयार केलेल्या कापडामध्ये आपल्याला निरनिराळे रंग व नक्षीकाम यांचा अनोखा संयोग दिसून येतो. नागा लोकांना पांढरा, लाल, काळा व हिरवा यासारखे प्राथमिक रंगच आवडतात. नागमोडी आकाराची नक्षी, वेगवेगळ्या भौमितिक आकृत्या, वाघ, सिंह, हत्ती यासारख्या प्राण्यांच्या आकृत्या व वेधक रंगसंगती वापरून तयार केलेल्या शाली मनाला भुरळ घालतात. इथे तयार होणारी 'अंगामी' शाल तर जगप्रसिद्धत आहे. कधीकधी हातमागावर तयार केलेल्या कापडावर नागा जमातीची निरनिराळी शस्त्रे तसेच मानवी आकृत्या देखील पहायला मिळतात.

नागालँडमध्ये फळबागांच्या लागवडीचा झपाट्याने प्रसार होत आहे. लोंगनाग येथील फळांवर प्रक्रिया करणारा कारखाना तुली येथील कागद कारखाना, सिट्रोनेल्लावर प्रक्रिया करणारा मोकोकचुंग जिल्ह्यातील कारखाना, कारवा जिल्ह्यातील बाघटी येथील अननस प्रक्रिया कारखाना यासारखे अनेक उद्योगधंदे येथे उदयास येत आहेत. याशिवाय साखरकारखाना, प्लायवूड कारखाना, रेशीम उद्योग, मधुमक्षिका पालन, खादीग्रामोद्योग देखील नागालँडच्या अर्थव्यवस्थेमध्ये महत्त्वाचा भाग बनले आहेत.

(क्रमश:)

● ● ●

# मुस्लीम धर्मानुयायी - तडवी भिल्ल

कै. मीरा तडवी

शासनाने वेळोवेळी व प्रसंगी विशेष वेगवेगळे उपक्रम प्रकल्प हाती घेतले असून त्या त्या माध्यमातून आदिवासींचा सर्वांगीण, (आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय बाबतीत) विकास व्हावा अशी शासनाची अपेक्षा आहे. यात जमिनी सोडवणुकी संदर्भात आदिवासींच्या बेकायदा हस्तांतरीत जमिनीबाबत दोन कायदे पारीत केले गेले.

पहिला कायदा १९७४ मध्ये महाराष्ट्र शासनाने जमीन महसूल संहिता व कुळवहिवाट विधी (सुधारणा) अधिनियम १९७४ चा ३५ वा या कायद्यान्वये जे ''बिगर आदिवासी'' खेडीत असतील त्यांनी त्यांना परत कराव्यात.

त्यामुळे आदिवासींमध्ये आपल्या जमिनी पूर्ववत मिळवण्याची प्रक्रिया सुरू झाली परंतु आदिवासींचे जीवन अत्यंत खडतर व आर्थिकदृष्ट्या निकृष्ठ असल्याने म्हणावे तसे यश त्यांच्या पदरांत पडत नसे.

कायद्यात अनंत पळवाटा शोधून ''बिगर आदिवासी स्थगिती'' आणीत त्यामुळे त्यांच्यात मानसिक ताण नि वैफल्याची भावना बळावत चालली ही बाब शासनाच्या लक्षात आली व त्यांनी दुसरा क्रांतीकारक कायदा तत्कालीन महसूल मंत्री श्री. एच. जी. वर्तक यांनी आणला.

हे विधेयक दोनही सभागृहात अनुक्रमे दि. ३०/८/७४ व ३/९/७४ रोजी एकमताने संमत झाले. मात्र य विधेयकाला ''राष्ट्रपतींची संमती'' मिळण्यास कालावधी गेला व कायद्याची अंमलबजावणी ''नोव्हेंबर १९७५ पासून कार्यान्वीत झाली.

अनुसूचित जमातींना जमिनी प्रस्थापित करणे अधिनियम (१९७४/१९७५ चा १४ वा )या कायद्यामुळे आदिवासींच्या जमिनी कायद्यातील पळवाटा घेऊन बळकावणाऱ्या बिगर आदिवासीयांमध्ये मोठी खळबळ उडाली.

या कायद्याच्या कायदेशीर बाबी संदर्भात हरकत घेणारे अनेक खटले मुंबई उच्च न्यायालयांत दाखल केले गेले नि या कायद्याच्या अंमलबजावणी विरूद्ध स्थगिती मिळविण्यांत आली.

त्यामुळे याही कायद्याची अंमलबजावणी बरोबर होऊ शकली नाही. शासनाने क्रांतिकारी म्हणून गौरविलेला हा कायदा न्यायालयाच्या आवारातच अडकून रहातो की काय अशी साधारण भीती निर्माण झाली.

परंतु सुदैव आदिवासीयांचे सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ४ डिसेंबर १९८४ रोजी या कायद्याविषयीचा अंतिम निर्णय देऊन हा कायदा पूर्णपणे ''वैध'' असल्याचे घोषित केले.

त्यामुळे आता आदिवासीयांना अडथळा (स्थगितीय) येण्याची भीती राहिली नसून त्यांनी संघटितरीत्या आपली शेती, (जमीन) मिळविण्यासाठी कटिबद्ध व्हावे.

आतापर्यंत राज्यांतील १५,९९८ आदिवासींनी याचा लाभ घेतला. बिगर आदिवासींकडे गेलेली १६,८३१ हेक्टर जमीन त्यांना परत मिळालेली आहे.

## मुस्लीम धर्मिय अडसर बिनबुडाचा

जळगाव जिल्ह्यात मुस्लीमधर्मिय आदिवासी तडवी-भिल्ल व त्यांचा समकक्ष वर्ग-निरढे या नहाळ हे

मुस्लीम असल्या कारणाने ''बिगर आदिवासी'' त्यावर बोट ठेवून त्या जमिनी त्यांना परत जाऊ नये यासाठी सक्रिय आहेत. परंतु ''तडवी भिल्लांनी'' या बाबत न डगमगता आपल्या जमिनी सनदशीर मार्गांनी परत मिळविण्यासाठी प्रयत्नशील असावे. समाज नि शासकीय कायदे संदर्भात पुढील माहिती त्यांना उद्बोधक ठरणारी आहे. आदिवासीयांसाठी धार्मिक आड येत नाही. त्यांनी हक्क व सवलती साठी जातीचा उल्लेख करावा. तडवी ही भिल्ल या जातीची पोटजात आहे. म्हणून त्यांनी ''तडवी भिल्ल'' असे नमूद करावे.

धार्मिक बाब आड येत नाही. या बाबत शासनाने डी.आर.ई., डी.सी.बी.सी १०५१/४४८३६ दिनांक १४/११/५२ ने जाहीर केले आहे.

## स्वातंत्र्यानंतरची जनगणना

स्वतंत्र भारताची पहिली जनगणना १९५१च्या फेब्रुवारीत झाली. त्यावेळी आदिवासींची धर्माची स्वतंत्रपणे नोंद घेतली गेली होती. त्यासाठी कोड नंबर व सांकेतिक चिन्हे चिन्हे देण्यात आली होती.

त्यानंतर १९६१,७१ व ८१ च्या जगनणनेमध्ये तीच प्रथा सुरू राहिली ही सर्व माहिती शासकीय अधिकारी गणतीदार व पर्यवेक्षक यांना माहित असून सेन्सस कार्यालयात ती उपलब्ध आहेच. त्यामुळे तुम्ही मुस्लिम आहात म्हणून आदिवासी नाहीत असे कोणी म्हणू शकणार नाही.

भारतभर धर्मांतरीत आदिवासी विखुरलेल्या अवस्थेत काही ठिकाणी लक्षणीय आढळून येतात. ईशान्य पूर्वेस मिझोराम, नागालँड, त्रिपुरा, मेघालय या चारहि राज्यात ''खिश्चन धर्मिय'' आदिवासी लक्षणीय प्रमाणात आहेत.

हिमाचल प्रदेशांत ''गुज्जर'' नावाची मुस्लीम आदिम जाती चम्बा पहाडाच्या पायथ्याशी वस्ती करून आहेत. त्यांचे सर्व जीवन डोंगर आणि जंगली गाई म्हशी, शेळ्या मेंढ्या यांच्याशी निगडित आहे. हे पशुपालक असून आपल्या प्राण्यांना खुट्यांशी बांधीत नाही. पाकिस्तानने भारतावर जेव्हा आक्रमण केले तेव्हा हा भेद गुज्जरानीच कळविला होता. हा एक ईमानदार विश्वास पात्र समाज आहे. त्यांना पाकिस्तानात जाण्याचे आमिष दाखविले गेले होते. परंतु त्यास त्यांनी दाद दिली नाही.

महाराष्ट्रातील चन्द्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात काही 'गोंड' मुस्लिम धर्मिय आहेत. गडामंडले येथे गोंड राणी दुर्गावती. हिचे राज्य होते. ते अकबराने जिंकल्यावर काही गोंड जमाती धर्मांतरीत झाल्या तरी त्यांच्यातील चालीरीती, रूढी नाहीशा झालेल्या नाहीत. त्यांची वस्ती नगण्य आहे.

त्रिपुरात एक अल्पसंख्य मुस्लीमधर्मीय आदिवासी असून 'चकमा नावाची जमात 'बौद्ध धर्मिय आदिवासी आहे. धनगर चिकवा मुस्लीम धर्मिय असून त्यांच्यातील काही शाखांचा पोट विभागांचा आदिवासी यामध्ये समावेश करण्यांत आला आहे.

शासनाने त्यांच्या धर्माकडे न पहाता त्यांना आदिवासी यांच्या सोयी सवलती, हक्कापासून अलिप्त ठेवलेले नसून त्या सर्वांना आपल्या जाती जमातींचा उल्लेख करणे आवश्यक असते. यादीतही ''जातीचाच'' उल्लेख असतो.

## तडवी-भिल्ल

जळगांव जिल्ह्यात सातपुडा पर्वताच्या पायथ्याशी व काही सपाटीवर-रावेर, यावल, चोपडा या तालुक्यांत व सातमाळा (अजिंठा) पर्वताच्या पायथ्याशी तसेच जामनेर व पाचोरा तालुक्यात तडवी भिल्ल यांची वस्ती आहे. औरंगाबाद जिल्ह्यांतील उत्तरेकडील भोकरदन, सिल्लोड व सोयगांव महसीलीच्या उत्तर भागात सातमाळा, (अजिंठा) परिसरांत यांची 'साधारण' वस्ती आहे.

## लग्नविधी

''तडवी भिल्लात'' कुळ आहेत. एका कुळात सोयरिक होत नाही. त्यांच्यातील काही ठराविक कुळ व काही गावकुळ पुढील प्रमाणे आहेत. घाटे, गायकवाड, बेंद्रे, चितोडे, मोरे, सोलंके, झिरा-झांझरे, गडकरी, डोंगरदरे, टिटवकर आदींचा समावेश आहे.

तडवी-पालक आपल्या मुलांची नाव शाळेत टाकतांना कुळ न लावता जातीवाचक तडवी आडनाव लावतात.

''देज'' लग्नविधीचा एक प्रमुख माध्यम आहे. वराच्या वडिलांनी वधुच्या वडिलांना ''देज'' दिल्याशिवाय तो ''वधुकडे'' लग्नास जावू शकत नाही. देज रू. साडेचार हजार रूपये मात्र असतो. त्यात अद्याप बदल नाही.

सगाई साखरपुडा हा एक लग्नाआधीचा देणगीचा प्रकार असतो. त्यास पंचायती, रित असे म्हणतात. पूर्वी पंचायतीचे दोन प्रकार असत. ''हलकी रित व भारी रीत'' हलक्या रितीमध्ये वराकडील मंडळी वधुकडच्यांना रू. ५१ देत व भारी रीत ठरल्यास रू. १०१ त्याच्या दुप्पट द्यावे लागत. ही प्रथा पूर्णत: बंद झाली असून, आता सरसकट रू. १५१/- मात्र द्यावे लागतात.

लग्नात एक महत्वाचा विधी असतो. त्यास 'टिका' असे म्हणतात. ३५-४० वर्षापूर्वी टिका वरून अनेकदा भांडणे झालेली स्मरतात, अधिकृत टिका म्हणजे सुवासिनी बाईनी वधु-वरास ओवाळायचे असते तसेच वधु-वरही एकमेकांस टिका लावीत ही प्रथा बऱ्याच अंशी लोप पावत आहे. लग्नात पूर्वी साजणी नृत्य केले जात होते. ही प्रथाही बंद पडत आहे. हुंडा प्रकार नसल्याने लग्नासाठी अडून रहावे लागत नाही.

## बोलीभाषा

यांची तडवी बोली भाषा असून तिच्यात मराठी,अहिराणी व हिंदुस्थानी शब्दाची सरमिसळ आढळते. स्थानपरत्वे बोलीभाषेत काही प्रमाणात फरक आढळून येतो. जामनेर व पाचोरा तहसील मध्ये सर्रास मराठी बोलले जाते.

## पोषाख

२०-२५ वर्षापूर्वी पुरूष मंडळी फेटा, कोट नि धोतर वापरीत फेटा व कोटची प्रथा जवळजवळ लोप पावली असून, बऱ्याच प्रमाणांत धोतर वापरली जातात. स्त्रिया नऊवारी लुगडी वापरतात व त्या कास्टा घेतात. शिकलेल्या मुली लुगड्या ऐवजी पातळ वापरू लागली आहे.

## उपजीविका

डोंगरातील कष्टाची कामे वापरण्यात यांचा हातखंडा आहे. पुरूषापेक्षा स्त्रिया कष्टाळू असतात. अलिकडे जंगलाचे नवीन नवीन कायदे अस्तित्वात येऊ लागल्यामुळे म्हणावं तसं काम डोंगरातील राहिले नसल्याने ते हळू हळू शेत मजुरीकडे वळू लागले आहेत. त्यांचे आर्थिक जीवन कमालीचे निकृष्ट आहे.

## तडवी समाजाचे जी-आर -

१. आदिवासीयाच्या बाबतीत धार्मिक बाब आड येत नाही. याबाबत शासनाने डी. आर. ई. डी. सी. बी. सी. १०५१/४४८६३ दिनांक १४-११-१९५२ ने जाहीर केले आहे.

२. भारतीय घटनेन्वये-मागासलेल्या जमाती जी.आर.पी. ॲण्ड एस.डी.नं. ४९०/४६ दिनांक १-११-१९५० ने राष्ट्रपतींनी जी यादी जाहीर केली आहे. त्यात ''तडवी-भिल्लांचौ समावेश आहे.

३. शिक्षणखाते पत्र नं.सी.बी.सी. १०५१/८९७५ जे दिनांक २२ एप्रिल १९५३ चा तपशील.

मान्यता पावलेल्या जमातीच्या ''पोटविभागात संबंधीत असलेल्या'' माणसांना मागासलेले

म्हणून ठरविले जाईल. मात्र त्यांनी मुख्यजात द्यावयास हवी. पोट विभागात असलेल्या जातीप्रमाणे आणि त्याच प्रमाणे ''पोटजात किंवा जमात'' द्यावयास पाहिजे ज्याच्याशी ते संबंधित आहेत. ''तडवी'' हे ''भिल्ल'' जमातीचे पोटविभाग म्हणून मानण्यात येतात तेव्हा त्यांनी स्वत:ला ''भिल्ल जमातीचे'' भाग म्हणून जाहीर केले पाहिजे. जर त्यांना मागासलेल्या जमातीच्या उपलब्ध असलेल्या सवलती हव्या असतील तर सरकार स्पष्ट करू इच्छिते की, त्यांना खालील कारणावरच मागासलेले म्हणून ठरविले जाईल ते कोणत्याही धर्माचे हिंदु-मुस्लिम असले तरी त्यांना सवलतींपासून अलिप्त ठेवले जाणार नाही.

४. वर्गीकृत जमातीच्या लोकांनी इस्लाम, ख्रिश्चन वा अन्य कोणताही धर्म स्वीकारला असला तरी ते वर्गीकृत जमातीच्या लोकांना मिळणाऱ्या सवलती व हक्क मिळण्यास पात्र समजण्यात येतात. तथापि त्यांना ''वर्गीकृत जमातीचे सदस्य'' म्हणून अर्ज करावा. लेबर ॲण्ड सोशल वेल्फेअर डिपार्टमेंट मुंबई राज्य ठराव क्र. सी.बी.सी. १०५८/१४-५-५८ चे शासकीय पत्र

५. भारत शासन गृह विभाग अंतर्भुत असि. कमिशनर यांचे जाती जमातीचे वर्गासंदर्भातील क्र. २७ नोव्हेंबर १९५२ चे पत्र.

आमचे रेकॉर्ड अनु-जमाती संदर्भातील पाहु जाता असे आढळुन आले की- ''तडवी-भिल्ल'' ही भारतीय घटनेतील कलम ३४२ अन्वये अनु.जमातीत अंतर्भूत असून ते मुख्यजात भिल्ल व पोटजात तडवी म्हणून ओळखले जातात.

६. क्रमांक सी.बी.सी. १५७६/३३६९४ का-५ समाज कल्याण सांस्कृतिक कार्य-क्रीडा व पर्यटन विभाग मंत्रालय विस्तार भवन मुंबई-३२ दिनांक १८ फेब्रुवारी १९७७.

जळगाव जिल्हा दंडाधिकारी यांना ''तडवी-भिल्ल'' या जातीचा समावेश अनुसूचित जमातीच्या यादीत करण्यात आला आहे. अनु-जमातीचे लोक कोणत्याही धर्माचे असले तरी अनु. जमातीचे दाखले सोयीसवलती मिळण्यास पात्र आहेत तेव्हा मुसलमान धर्माच्या लोकांना आपण त्या धर्माचे नाहीत असे प्रतिज्ञापत्र देण्याची काही जरूरी नाही. शनिलेवर व समाज कल्याण विभाग क्र.सी. १०५८ ई १४-५-८७ कडे लक्ष वेधण्यात येत आहे.

तडवी समाजाने या बाबत दक्षता ठेवून शासनाने हस्तांतर जमिनी संदर्भात जे दोन कायदे केले आहेत. त्यानुसार आपल्या जमिनी मिळविण्यासाठी सक्रिय असावे. धर्मासंदर्भात खुलासेनुसार माहिती कथित केली असून, भारतातील अन्य ठिकाणी असलेल्या धर्मियांचा तपशील विस्ताराने दिला आहे. त्यामुळे इस्लाम वा मुस्लीम असले तरी त्याबाबत भिती बाळगण्याचे कारण नाही.

''तडवी-भिल्ल'' जाती संदर्भात अनेक पाश्चिमात्य मानव शास्त्रज्ञांनी तसेच भारतीय मानव शास्त्रज्ञांनी ग्रंथाद्वारे माहिती करून ठेवली आहे. त्यातून ही जुजबी माहिती सादर केली आहे.

## उपजीविका

डोंगरातील कष्टाची काम करण्यात यांचा हातखंडा असतो. पुरूषापेक्षा स्त्रिया कष्टाळू असतात. अलिकडे जंगलाचे नवीन कायदे अस्तित्वात येऊ लागल्यामुळे म्हणावं तसं काम (पूर्वीसारखे) राहिले नसल्याने ते हळूहळू शेती व मजुरीकडे वळू लागले आहेत. त्यांचे आर्थिक जीवन कमालीचे निकृष्ट आहे.

त्यांची सर्व साधारण माहिती करून देण्याचा उद्देश एव्हढाच की ते धर्माने मुस्लीम असल्याकारणाने त्यांचा जो छळवाद चालता आहे त्यासाठी ही माहिती जुजबी दिली आहे.

## तडवी समाजासाठी शासकीय मदत

'तडवी-भिल्ल' समाजाने या बाबत दक्षता ठेवून शासनाने हस्तांतर जमिनी संदर्भात जे दोन कायदे केले आहेत. त्यानुसार आपल्याजमिनी मिळविण्याची प्रक्रिया सक्रीय ठेवावी. धर्मा संदर्भात तपशिलात दिले असून भारतातील अन्य ठिकाणी असलेल्या धर्मियांचा खुलासा दिला आहे. त्या मुळे धर्म इस्लाम वा मुस्लिम असलातरी तडवी भिल्ल' या आपल्या जातीचा उल्लेख करावा. आपल्या 'तडवी-भिल्ल' संदर्भात आंग्ला श्रमदानीत अनेक पाश्चिमात्य मानस वंश शास्त्रज्ञांनी व भारतीय मानसशास्त्रज्ञांही ग्रंथरुपाने प्रसिद्ध केली आहे त्या ग्रंथातून जुजबी माहिती आपणास सादर केली आहे. बिगर आदिवासीयांनी सुद्धा समाज अडाणी असल्याने त्यांना सहकार्य देण्याची गरज आहे ही काळाचीहि गरज आहे.

*(कै. मीरा तडवी यांच्या संग्रहातून)*

● ● ●

## - हाकारा -

### (फॉर्म ४, नियम ८ नुसार निवेदन)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रकाशन स्थळ | : | ६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ४११ ००७. |
| २. | प्रकाशन काळ | : | त्रैमासिक |
| ३. | मुद्रक, प्रकाशक व संपादक | : | रामचंद्र केशव मुटाटकर |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | ६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ७. |
| ४. | स्वामित्व | : | महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद<br>६४, आनंद पार्क, औंध पुणे - ४११ ००७. |

मी. रा. के. मुटाटकर जाहीर करतो की, वरील तपशील माझ्या माहितीनुसार व समजुतीनुसार खरा आहे.

३१ जानेवारी १९९६

**रा. के. मुटाटकर**
प्रकाशक

# कर्नाटकातील सिद्धी जमात

- डॉ. शौनक कुलकर्णी

अठरापगड जाती-जमातींनी परिपूर्ण अशा या देशात आजवर निरनिराळ्या जमातींचे पंथाचे लोक बाहेरुन इथे आले, राहिले आणि अगदी इथलेच होऊन गेले; इथल्या मूळच्या समाजात मिसळून गेले. यातील काही आले लुटारु म्हणून, तर काही प्रवासी म्हणून, काही गुलाम म्हणुन, तर काही आक्रमक म्हणून, यांपैकी एक जमात म्हणजे, सिद्दी. सिद्दी लोक आज प्रामुख्याने कर्नाटक, गोवा आणि गुजरात राज्याच्या काही भागात स्थायिक झालेले आहेत. त्याच प्रमाणे आंध्र आणि बंगालमध्येही तुरळक प्रमाणात आहेत. मूळच्या पूर्व आफ्रिकन प्रांतातील सिद्दींना १४ व्या ते १६ व्या शतकाच्या कालवधीत गुलाम म्हणून भारतात आणले गेले. याच लोकांचा सिदी, सुदी, काफरी, निग्रो असाही उल्लेख झालेला आढळतो.

महंमद तुघलकाने ज्या वेळी भारतावर स्वारी केली, त्या वेळी त्याच्या फौजेत बॅडमन, सफाई कामगार, फौजेचे साहित्य वाहून नेणारे हमाल यासाठी म्हणून सिद्दीचा वापर करण्यात आला होता. अरबी व्यापारी आपल्याबरोबर भारतात येताना गुलाम म्हणून सिद्दीना आणत असत. आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यावरुन, इराणच्या आखातातून, कच्छच्या रणामार्गे सिद्दी भारतात प्रवेशित झाले असावेत. याबरोबर कलकत्ता जर्नलमध्ये असाही एक उल्लेख सापडतो, की अरब लोकांच्या जहाजातून शंभर काळे गुलाम भारतात उतरवून घेण्यात आले आणि त्या बदल्यात स्थानिक स्त्रिया अरब देशांत नेण्यात आल्या. यानंतरच्या काळात म्हणजे पोर्तुगीज ज्या वेळी प्रथम भारतात (गोव्यात) आले त्या वेळी त्यांनीही काही आफ्रिकन सिद्दी कुटुंबे आपल्याबरोबर गुलाम म्हणून आणली होती. एके ठिकाणी आलेल्या उल्लेखानुसार इ. स. १४८९ मध्ये वेषांतर करुन आलेल्या आफ्रिकन व्यापाऱ्यांनी सुमारे तीनशे पेट्या जंजिऱ्याच्या किनाऱ्यावर उतरवू देण्याची मागणी जंजिऱ्याच्या राजाकडून मान्य करुन घेतली, परंतु या पेटाऱ्यात हापसे होते. या सर्वांनी मिळून जंजिऱ्यावर हल्ला केला आणि जंजिरा ताब्यात मिळविला. हापसे येथे येण्यापूर्वी जंजिऱ्याचा उल्लेख राजापुरी असा मिळतो.

दुसऱ्या एका मतप्रवाहनुसार व्यापाऱ्यांनीच असे राज्य निर्माण केले असावे. काहीही असले तरी इ. स. १८२० पर्यंत जंजिऱ्यामध्ये सिद्दींचे राज्य होते. आफ्रिकेतील इथिओपियाच्या भागात 'सिदानो' नावाची एक मोठी जमात असून, त्याच्या सात शाखा पडतात. यांपैकी 'ओमेटो' आणि 'जंजिरो' या शाखातील लोक भारतात आले आणि त्यातील जंजिरो लोकांच्या वसाहतीलाच जंजिरा नाव पडले असावे. याप्रमाणेच काही भागांतही सिद्दी लोकाच्या स्वतंत्र वसाहती होत्या. शहाजहानच्या फौजेत याकूतखान नावाचा सिद्दी अधिकारी होता. थोडक्यात, काही सिद्दी लोक जरी दारिद्र्यात, गुलामीत पिचत असले तरी त्यांतील काही गट सांपत्तिकष्ट्या संपन्न होते आणि आलेले दोन्ही गट सिद्दी असले तरी त्यांच्यामध्ये संपर्क नव्हतां.

ऐतिहासिक काळात झालेले सिद्दींचे आगमन आणि त्याची कारणे विविध असली तरी सिद्दींच्या पौराणिक कथेत असा असा एक उल्लेख येतो, की राम-रावणाच्या युद्धात सिद्दींनी रावणाची बाजू घेतली होती. राम-रावणाच्या युद्धात रावणाचा पराभव झाला, या युद्धाच्या आगीत आणि लंका दहनात सिंद्दीचे केस जळले आणि त्यामुळे ते कुरळे झाले, या कथेस कोणताही

ऐतिहासिक-शास्त्रीय असा आधार नसला तरीही हिंदू पुराणकथेत, काळा रंग, पसरट, चपटे नाट, कुरळे केस, काहीसा दणकट बांधा असलेल्या लोकांचा 'राक्षस' म्हणून उल्लेख झालेला आढळतो, दण्डकारण्यातील आणि त्याच्या दक्षिणेकडील लोकांची वर्णनेसुद्धा काहीशी अशीच पाहावयास मिळतात. यावरून सिद्दी वंशासमान किंवा तत्सम लोक या प्राचीन काळात भारतीयांना माहीत असावेत किंवा एकमेकांच्या संपर्कात येत असावेत, असे वाटते.

कसेही असले तरी गुलाम म्हणून आलेल्या सिद्दींचे आयुष्य दु:खद आणि कष्टमय होते. गुलामांना स्वत:चे स्वतंत्र आयुष्य असे नसतेच. कित्येक वर्षे पिढ्या न् पिढ्या अशाच अवस्थेत जगत असल्याने, स्वत:ची संस्कृती, रीतीरिवाज हळूहळू विसरले गेले. दुर्बल, असहाय अवस्थेत जन्मभूमीपासून दूर आल्यावर आणि सततच्या बंधनांमुळे ज्या समाजाबरोबर संपर्क अधिक आला त्यांच्या धार्मिक-सामाजिक चालीरीती उचलल्या गेल्या. कालांतराने स्वत:ची पद्धत, इतकेच काय भाषाही विसरली गेली. भारतातील सिद्दी हे मुस्लिम, ख्रिश्चन आणि हिंदू धर्मांचे आहेत. जे सिद्दी मुस्लिम अरबांबरोबर आले ते मुस्लिम आहेत. पोर्तुगालांबरोबर आलेले सिद्दी हे प्रामुख्याने ख्रिश्चन आहेत.

याबरोबरच कित्येक सिद्दी हे हिंदूसुद्धा आहेत. सततच्या हिदू संपर्कामुळे हिंदूच्या कित्येक पद्धती, रीतिरिवाज उचलले गेले आणि त्यामुळे आज ते स्वत:चा धर्म हिदू म्हणूनच सांगतात. असे असले तरी खिस्ती मिशनऱ्यांनी कर्नाटकातील सिद्दी गावामध्ये इतक्या मोठ्या प्रमाणात काम कले आहे, की त्या अनुषंगाने सर्व गावेच्या गावे खिस्ती सिद्दी समाजातील आहेत.

धार्मिक, भाषिकदृष्ट्या आणि प्रांतानुसार हा एकच समाज विविध गटांत विभागला असला तरीही वांशिकदृष्ट्या, शरीरचनेनुसार समान आणि एकाच वंशाचे आहेत. मध्यम उंची, काळा रंग, मोठा, जाड उचललेला वरच ओठ, पसरट नाक, कुरळे केस, केसांचे प्रमाण कमी ही त्यांची सर्वसाधारण लक्षणे आहेत. कर्नाटकातील सिद्दी हे मुख्य वस्तीपासून दूर, जंगलात डोंगर उतरणीवर राहत आहे. त्यांचे हे नैसर्गिक स्थान आणि कमालीचे दारिद्रय यामुळे आदिवासींचा दर्जा मिळावा, अशी या समाजाची मागणी आहे, गुजरातेत यांना आदिवासींचा दर्जा मिळालेला आहे.

सिद्दी फक्त भारताच आले असे नव्हे, तर इथिओपिआमधून पश्चिम आफ्रिका, मध्य आफ्रिका, अरबस्तानातही विविध ठिकाणी त्यांच्या तुरळक वसाहती आहेत. प्रामुख्याने मुस्लिम आक्रमक आणि अरबी, युरोपियन व्यापाऱ्यांबरोबर सिद्दींच्या वसाहती एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी गेल्या; परंतु भारतातील सिद्दी समाज हा स्थलांतराचा एक नमुना आहे, इराक, इराण, मध्य आशिया आणि उत्तरेकडून भारतावर सतत आक्रमणे होत आली आहेत, त्याप्रमाणेच व्यापार, प्रवासासाठी विविध लोकांचा, समाजांचा येथे पूर्वापार वावर राहिला आहे. असंख्य वर्षांच्या या परंपेमुळे विविध वंशांची सरमिसळ येथे झाली. निग्रिये वंशाचे सिद्दी असेच आफ्रिकेतून आले, ज्यांच्याबरोबर ते आले-राहिले यांचा धर्म, संस्कृती त्यांनी आत्मसात केली, त्याचा प्रभावही इतका मोठा होता, की त्यांची मूळची संस्कृतीच काय; पण भाषाही ते विसरले. परंतु त्यांच्यातल्या त्यांच्यात होत राहिलेल्या विवाहांमुळे त्यांचे मूळचे आनुवांशिक घटक अगदी आजही स्वतंत्र राहून शकले आणि ते त्यांच्या शारीरिक गुणधर्मावरून दिसते. सिद्दी संस्कृतीचा इतरही संस्कृतींशी संबंध आला; संघर्ष झाला आणि त्यांची मूळ संस्कृती नामशेष झाली; परंतु आनुवांशिक हितसंबंध जपले गेल्याने त्यांच्यातील आनुवांशिक घटक-शारीरिक स्वरुप जपले गेले. अशा प्रकारे आफ्रिकन (निग्रो) वंशीय सिद्दी भारतीय संस्कृतीच्या प्रवाहात सामावले गेले.

(सकाळमधून साभार)

● ● ●

# दरिद्रीनारायण आदिवासींचा शोध व बोध

- कै. मीरा तडवी

संस्कृती ही इतकी व्यापक गोष्ट आहे की, ती अंगोपांगाने सांगणे अष्टपैलू विद्वान, अभ्यासक, समाजशास्त्रज्ञ - मानववंश शास्त्रज्ञ नि संशोधक ह्यांनाच शक्य होऊ शकते.

काही वर्षापूर्वी केंब्रिज युनिव्हर्सिटीतर्फे निघालेल्या प्रागैतिहासिक मालेची पुस्तकं व मानव वंशशास्त्राच्या प्रकांड ज्ञान असलेल्या महाराष्ट्राच्या कै. डॉ. इरावती कर्वे यांचीही पुस्तकं नजरेखालून घातली. त्यावेळी जगातील तसेच भारतातील रानटी मानव कसा आहे. त्यांचे विदारक चित्र, त्यांचे जीवन राहणीमान, व्यवसाय आदि गोष्टी बऱ्याच काही कळू लागल्या, समजू लागल्या, ध्यानी येऊ लागल्या. सुसंस्कृत लोकांनी या मानवाला दिलेल्या यातना, दु:ख, क्लेश याचा जर बारकाईनं व खोलवर अभ्यास केल्यास असे दिसून येते की, आपले पंतप्रधान श्री. राजीव गांधी जेव्हा २१ व्या शतकाच्या कॉम्प्युटरच्या वाटचालीकडे मोठ्या आशेने, अभिमानानं व आव्हानात्मक भाष्य करीत असतात तेव्हा या दऱ्याखोऱ्यातील परिसरातील पर्वताच्या सान्निध्यात रहाणारा 'दरिद्री नारायण' ज्याला आज आदिवासी या नावानं संबोधल जातं व घटनाकारानी घटनेत ज्यांना ''अनु-जनजाती'' वा ''जमाती'' म्हणून संबोधिले आहे.

त्यांच्या प्रगतीचा ओनामा (इतिहास) या ४० वर्षाच्या वाटचालीत त्यांनी किती प्रगती केली हे जेव्हा आम्ही २१ व्या शतकात पदार्पण करू तेव्हा हा कुठवर आलेला असेल याचा शोध व बोध आम्हास घ्यावा लागेल. आमच्या शेजारी असलेले ''बामणी'' आदिवासी गांव व तेथे परवा जे ''मृत्यूकांड'' झाले तेव्हाचा आक्रोश सुधारलेल्या सुसंस्कृत मानवाला व शास्त्यांनाही निश्चितच कमीपणा आणणारा आहे. ४० वर्षाची आमची ''गरूड झेप'' या दरिद्री नारायणासाठी किती कूर्मगतीने गतीने वाटचाल करीत आहे. याचा हा विकृत पुरावा नव्हे काय?

मधून मधून त्यांचेवर होणारे अत्याचार, बलात्कार, ठोकपिठ दैनंदिन आपण वाचीत असतो ही काय त्यांची प्रगतीची लक्षणं होत काय? त्यांच्यावर होत असलेले अन्याय यांचे आवाज सरकार दरबारी सातत्यानं घोंघावत असतातच.

तेव्हा अशा या मानवाचा आंग्ल अमदानीतही म्हणावी तशी प्रगती यांच्यासाठी कोणी केली नाही. त्या कालखंडात मात्र बऱ्याच मानववंश शास्त्रज्ञांनी व समाजशास्त्रज्ञांनी त्यांच्या जीवनावर ''वाङमय संपदा'' करून ठेवली आहे. त्यावरून त्यांच्या जीवनावर चांगला प्रकाश पडतो. यांत पाश्चिमात्य शास्त्रज्ञांची संख्या बरीच असून भारतीयांचे प्रमाण त्यामानाने खूपच कमी आहे.

इतिहास, संस्कृती ही एक ऐतिहासिक परंपरा आहे ही प्रक्रिया सातत्याने सुरू आहे. संस्कृतीचा उदय व अस्त ही अबादीत क्रिया आहे. काहीं संस्कृतींचे महत्व अगम्य आहे. ती सहसा नष्ट होत नाही. त्यांचे अवशेष जतन करून असते. काही वन्य जमातींची वैशिष्ट्ये अलौकिक आहेत. त्यांचा संपूर्णत: नाश होणे असंभवनीय आहे. साधारण वन्यजाती, गिरीजन, अनुन्नत - जनजाती, प्राथमिक वन्य जनजाती, तद्देशीय मूळची जाती, अरण्यवासी, पहाडीजाती, रानीपरपज, काळीप्रजा या नावानंही यांना संबोधिले जाते.

आंग्ल अमदानीत १९११ च्या जनगणनेत यांची ''पशूदेववादी'' व १९२१ च्या जनगणनेत ''वन नि

पहाडी जाती'' १९३१ च्या जनगणनेत ''प्राथमिक जनजाती या नावानं संबोधण्यात आली होती. भारत शासनाच्या १९३६ च्या कायद्यान्वये प्रांतीय विधानसभांच्या कलम १३ अन्वये व १९४१ च्या जनगणनेनुसार ''जनजाती'' संबोधण्यात आले.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर १९५० संविधानानुसार यांना ''वन्यजाती'' (जनजाती) म्हणून उल्लेखण्यात आले.

## वर्गीकरण

''श्री. बैरनवान ऐकिडेट'' या मानववंश व समाजशास्त्रज्ञाने यांचे वर्गीकरण ''तीन प्रधान'' मुल्यांवर अधिष्ठित केल्याचे आढळून येते. ज्यांना-वैदिद (पूर्वाधर्मीचे भारतीय) मालानिद कृष्ण तथा काळसर भारतीय व इंदिरा (नूतन भारतीय) दुसऱ्या मानववंश शास्त्रज्ञ श्री. ''डॉ. गुहा'' यांनी या ''तीन मूलगामी क्षेत्रांचा उल्लेख'' ''भारतीय जनजाती'' केले आहे.

१. उत्तर पूर्व क्षेत्रात अेक पूरक ठोस क्षेत्र व न्यूनतेने (मानसिक दुर्बलता व बुजरेपणा) ग्रासलेले आहे. ज्यांच्यात मंगोलाईड जाती'' चे अनुशेष उपलब्ध आहेत.

२. केंद्रीय एरिया वा क्षेत्र ज्यांच्याशी ''मेटो ऑस्ट्रलाईड जाती'' (वेदिद्जाती समकक्ष) म्हणून ओळखले जात.

## प्रशासकीय वर्गीकरण

प्रशासनाच्या दृष्टीने या वनजातीचे काही वर्गीकरण करण्यात आले आहे.

१. वनजाती संस्कृती

२. अर्धवनजाती संस्कृती

३. कृषिपूर्व वनजाती संस्कृती

४. संपूर्ण विलीन जनजाती

## आदिवासीयांची जनसंख्या

अखंडित भारतात सन १९४१ च्या जनगणने नुसार आधारीत जनजातींची संख्या २,४७,१२,००० अशी होती ही जनसंख्या असलेल्या एकूण ३१,८३,०१,९०० च्या ७.८ टक्के होती परंतू स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राष्ट्रपतींनी १९५० च्या संविधानाचा 'ग' सूचीच्या कलम ३४२ च्या अनुषंगाने वनजातींची संख्या १,७८,७३,००० दाखविण्यात आली. वस्तुस्थिती अशी आहे की, १९५१ च्या जनगणनेनुसार त्यांची संख्या १,९१,१६४९८ अशी होती.

## असे कां घडले?

वनजातींचे नव्याने वर्गीकरण करण्यांत आले त्यांत संशोधन केले गेले ज्यांच्यात ''वन्यजातीचे मूल वैशिष्ट्ये'' अजिबात नव्हती अशा काही जाती वगळण्यांत आल्या व ज्यांच्यात उदा. पहाडीक्षेत्र, परिसरांत असलेली त्यांची वस्ती, त्यांची भौगोलिक सलगता, रहाणीमान, त्यांच्या बोलीभाषा, त्यांची वैशिष्ट्ये, पोषाख, चालीरिती, लग्नविधी, देवदेवता नृत्य व संगीतादि प्रकार अशा या ''दरिद्री नारायणाचा'' अंतर्भाव (जनजातित) करण्यांत आला.

## परकीय शास्ते

भारतातील वा अन्य देशात जे परकीय शास्ते शासनकर्ते होते त्यांचे वन्यजातीकडे म्हणावे तसे लक्ष गेले नाही आणि गेले तरी त्यांनी त्यांच्यासाठी काही सोयी-सवलती प्रदान केल्या नाहीत व त्यांना त्यांची तशी आस्थाही वाटली नाही.

आज स्वातंत्र्याला ४० वर्षे होऊन ४१ व्या वर्षात पदार्पण केले असले तरी वन्यजातीत म्हणण्यासारखे स्थित्यंतर झाल्याचे आढळत नाही ही एक मोठी खंत आहे.

अन्य वर्गसमूहाबरोबर येण्यास त्यांना बराच

कालावधी लागेल हे माझ्या निवडणुकी नाही मला पूर्णत: कळून आले आहे. आदिवासी यांविषयी बेगडी माया खूप. परंतु मनोभावे त्यांचे संवर्धन करणारे विरळाच. हाताच्या बोटावर मोजण्याइतपत असू शकतील.

## आदिवासींची आंदोलने

आदिवासींमध्येही प्रबळ आंदोलन झाली आहेत. सन १९४६ ला खोंड जातीने, १८५५ मध्ये संथाळांनी, खानदेशांत भिल्लांनी सरकार विरोधी आंदोलन केल्याचा इतिहास फारसा जुना नाही अशी आंदोलन परिस्थितीजन्य घडत आलेली आहेत.

अलिकडे १९३८-३९ साली पूर्वीचे मुंबई इलाख्यातील ठाणे जिल्हयातील आंदोलन न विसरता येण्याजोगे आहे. त्यावेळी आपल्या भूतपूर्व मुंबई इलाख्याचे पंतप्रधान श्री. बाळासाहेब खेर होते. आदिवासीयांसाठी ''सेमिंग्टन कमिशनची नियुक्ती केली गेली होती. त्याचा अहवाल आदिवासीयांसाठी एक उत्तमसा मार्गदर्शक आहे.

कर्मधर्म संयोगाने ठाणे जिल्ह्यात आदिवासीयांसाठी त्यांच्या उन्नतीसाठी एक परंपरा निर्माण झाली तेथील ''वारल्यांचा उठाव'' व ''वेठबिगारीच्या'' विमोचनासाठी ''श्रीमती गोदावरीताई परूळेकर'' या पांढरपेशा भगिनीनी आपले जीवन सातत्याने वाहून घेतले आहे. त्यांची वाङमय संपदाही आदिवासीयांसाठी एक अनमोल ठेवा आहे. दुसऱ्या पांढरपेशा भगिनी ''श्रीमती अनुताई वाघ'' यांनी तर कोसबाड व सभोवतालचा प्रदेश जणू कांही दत्तकच घेतला आहे. त्यांचीही ''वाङमय संपदा'' आदिवासींचे जीवनावर बरेच काही सांगून जाते. त्यांच्या कार्यात ''दर्प'' नाही. बेगडी वा दांभिकपणा नाही. आत्मीयतेने व मनोभावे त्यांनी आदिवासींना आपलेसे केले आहे. कै. आचार्य भिसे यांनीही ''बोर्डीचा परिसर'' जागृत केला. त्यांचेही एक पुस्तक आदिवासी संदर्भात खूप काही सांगते. अशा या व्यक्तींनी ठाणे जिल्ह्याचा परिसर ढवळून काढला. तशी दिव्य व भव्य परंपरा जळगाव जिल्ह्याला मात्र लाभू शकली नाही ही एक मोठी व्यथा आहे.

## ब्रिटिशांची नीती

इंग्रजी शास्तांनी १८७४ व १९१९ च्या कायद्यान्वये अनुसूचित क्षेत्रासंदर्भात पृथकतेची भावना निर्माण केली. व १९३५ च्या कायद्यान्वये शासनकर्त्यांनी काही विशेष शासकीय दृष्टीने पूर्ण निष्कांसीत क्षेत्र व अंशत: निष्कांसीत क्षेत्र जाहीर केली गेली. अशा प्रकारे आदिवासीयांमध्ये एक मोठी खिंड, दरी, विलगता, निर्माण करण्याचा दुष्ट हेतू होता. ब्रिटिशांची नीती नेहमी कुटीरतेची होती व अंतिमपर्यंत राहिली.

अशा वेळीही ''ग्रिम्सन व हटन'' सारख्या शासनकर्त्यांनी कांही ठोस कार्यक्रम ''वनजाती साठी'' उचलले. यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. यात मानव वंश शास्त्रज्ञ ''डॉ. वैरियर एल्विन'' यांचे स्थानही मोलाचे आहे.

## आपले मृतपूर्व राज्य

आंग्ल अमदानीत आपले राज्य चौभाषिक होते त्यास ''मुंबई इलाखा'' असे संबोधण्यात येई त्यात कानडी भाषिक ४ जिल्हे मराठी भाषिक १२ जिल्हे व गुजराथी भाषिक ६ जिल्हे सिंध (आता पाकिस्तानात) भाषिक मिळून मुंबई इलाखा (राज्य) होते. १९३५ च्या कायद्यान्वये सिंध भाषिक हा वेगळा ''सिंध प्रांत'' करण्यांत आला म्हणजे १९३१ साली जी जनगणना करण्यात आली होती ती चार भूभाषिक विभागातील होती. परंतु १९३५ मध्ये सिंध वेगळा करण्यांत आला त्यामुळे सिंध भूभागातील जनजाती वगळण्यांत आल्या त्या १९४१ च्या जनगणनेत व नंतर १९५१ ची खानेसुमारीत फारशी तफावत नव्हती. त्यानंतर द्विभाषिक (भाषिक पुनर्रचनेमुळे) राज्य झाले. त्यामुळे

४ जिल्हे कर्नाटकात गेले व पूर्वीच्या मध्यप्रान्तातील मराठी भाषिक (विदर्भ व नाग) व हैदराबाद स्टेटमधील मराठवाडा मराठी भाग व संपूर्ण गुजराथी भाषिक एकत्र आले.

## काही आदिवासी

तेव्हापासून म्हणजेच १९५६पासून जमातीत क्षेत्रीय बंधने आलीत विदर्भातील चंद्रपूर नि अलिकडेच अस्तित्वात आलेला ''गडचिरोली'' जिल्हा. यवतमाळ व अमरावती जिल्ह्यात गोंड, कोरकू माडिया, परधान, आंध्र व त्यांच्या उपशाखा यांची भरपूर संख्या या जिल्ह्यातून आढळून येते. गडचिरोली जिल्हा हा ''विदर्भातील आदिवासीयांचा बालेकिल्ला'' म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. त्यांच्यातील काहींनी तर अद्याप रेल्वेही पाहिलेली नाही.

गडचिरोलीला माझे मोठे दिर असतांना त्यावेळी गडचिरोली, चंद्रपूर, ब्रम्हपूरी, आदि भागात भ्रमंती केली. त्यावेळी त्यांचे जीवन जवळून पहातां आले. त्यांचे जीवन कष्टमय अत्यंत खडतर असे आहे. आर्थिक परिस्थितीमुळे जीवन फारच निकृष्ट बहुतेक आदिवासी भगिनीच्या अंगावर चोळीही नसते. लुगडीही अर्धवट असे यांचे भेदक जीवन आहे.

गुजराथमधील (द्विभाषिक असतेवेळी) डांग, सुरत, भडोच, पंचमहाल, सांबरकाठा, आदि जिल्ह्यांत जंगल व पहाडी क्षेत्रात भिल्ल तथा धानका ही प्रधान जात आहे. भिल्लांना काही काही क्षेत्रात ''धानका'' ही संज्ञा आहे. यांच्यातील काही पोटजाती वळवी, तडवी, ततारीया आदि धरून धानका वा भिल्ल म्हणून संबोधितात.

आपल्या धुळे जिल्हयात ''बामणी मृत्यूकांड'' जे घडलं ते अक्कलकुवा, अक्राणी, तळोदा, आदि तहसिलातील व परिसरातील ''धानका'' उर्फ भिल्लांच्या उपशाखा वळवी, तडवी, व ततारीया यांचे अधिक मृत्यूकांड घडले होते.

गुजरातच्या काही भागात धानका उर्फ भिल्ल व त्यांच्या उपशाखा लक्षणीय आहेत सन १९३१ च्या जनगणनेत ''तडवी'' अशी स्वतंत्र जात म्हणून नोंद नाही कारण ''तडवी'' ही भिल्लांची (धानकांची) उपशाखा वा पोटजात आहे. १९४१ च्या जनगणनेतही ''तडवी भिल्ल'' अशीच नोंद आहे.

## स्वातंत्र्य प्राप्तिनंतर

त्यांचा सभोवतलाच्या व भोवतालच्या लोकांशी संबंध येऊ लागला. काही दुर्गम भागातून रस्त्यांच्या सोयीही काही प्रमाणात निर्माण झाल्या. या बाबत अजून खूप मजल गाठावयाची आहे. त्यांच्या अनेक प्रश्नांची अडचणीची दारिद्रयाची इत्यादी बाबींची कार्यकर्त्यांना, समाजसेवकांना जाण होऊ लागली. अशा अनेक कार्यकर्त्यांनी मनोभावे अंत:करणापासून त्यांच्याशी बांधीलकीच केली आहे. धन्य आहेत ते आपले जीवन त्यांचेसाठी वेचीत आहे.

अबोल बोलू लागला, त्यांच्यातील न्यूनगंड कमी होऊ लागला शिक्षणाचा प्रकाश मिळू लागला. त्यांच्यात साक्षरता प्रचार व्यावसायिक शिक्षण, आरोग्य संवर्धन, सांस्कृतिक शिक्षण यांची निकड जाणवू लागली.

कष्ट अविरत कष्ट, काबाडकष्ट, मरणाचे कष्ट नि कष्टाचे हेच त्यांना माहित. कष्ट कशासाठी त्यांना हेही कळत नसेल कदाचित. काहीतरी करायचे. आदरतिथ्य करण्याची परंपरा अखंड परंपरा त्यांनी जोपासली आहे. ''बंधुत्व शब्द'' त्यांना माहित नसावा पण ''बंधुधर्म'' ते कसोशीनं पाळतात. दारिद्रयाने सतावलेले अज्ञानानं भेदरलेले असे हे धरित्रीचे लाल आहेत.

या वन्यजाती संदर्भात अनेक मानववंशशास्त्रज्ञांची भिन्न भिन्न मतं आढळून येता कै. डॉ. इरावती कर्वे या महान मानववंश शास्त्रज्ञांचे मते या ''वन्यजमाती''

आदिमोंगोल, ऑस्ट्रेलियन नि वेद अशा तीन अनादिजाती वंशाचे मिश्रण असावे.

संस्कृत वाङ्मयात निषादकिरात, पुलिद शबरं यासारख्या असंस्कृत वन्यजातींचा उल्लेख आढळून येतो. रामायणातील ''शबरी भिल्लीणीची'' कथा प्रसिद्ध आहे. भारतात ''एकलव्याचा'' द्रोणाचार्यांनी तो नेमबाजीत अर्जुनापेक्षा वरचढ होऊ नये म्हणून अंगठ्याचा उपयोग न करण्याची शपथ पण दिल्याची कथा आहे. हे धनुर्धारी किरात अद्याप बाण सोडताना अंगठा दोरीला लावीत नाहीत. तसेच कृष्णाचा मृत्यू एका भिल्लाच्या बाणाने झाला म्हणूनही ''भिल्ल लोक'' अंगठ्याजवळचे बोट तर्जनी धनुष्याच्या दोरीला लावेनासे झाले त्यामुळे त्यांचा बोटांचा उपयोग होत नाही. (मेजर हॅडलेकृत-ॲन अमाउंट ऑफ दि भिल्स पृष्ठ ३६९)

वेद्द किंवा बिल्लवर या द्रविडीजाती प्रमाणे चोऱ्या कारून उपजीविका करणाऱ्या भिल्ल व तत्सम जमातीचा श्री. रसेल व हिरालाल या मानववंश समाजशास्त्रज्ञांनी विस्ताराने केला आहे.

भिल्ल व त्यांच्या पोटशाखा धरून भिल्लांची लोकसंख्या १९४१ नुसार जळगांव जिल्ह्यात ४९,६९७ धुळे जिल्ह्यात २,५२,८४३ व नाशिक जिल्ह्यांत ७७,४८७ अशी होती. भूतपूर्व मुंबईप्रांतात ५,६८,५७६ अशी भिल्लांची वस्ती होती. तथापि राजपुतानाच्या खालोखाल गुजरात व नंतर शेष ठिकाणी संख्या प्रामुख्याने आढळून येते.

सह्याद्रिला काटकोन करून पूर्वेकडे सातपुडा पसरला आहे. महादेव नि मेखल पर्वत हे सातपुड्याचे भाग मैखलकन्या जी नर्मदा हिच्या प्रवाहशक्तीला आवर घालण्यासाठी महादेवाने विंध्य व त्याचे सातपुत्र यांना आदेश दिला त्यांनी नर्मदा नियंत्रित केली.

सप्तपुत्रापासून कोणी सातपुडा नांवाची व्युत्पति शोधतात तर दुसरे सातपुडे (सातरांगा) असणारा पर्वत अशी सोपी समजूत देतात. ते काहीही असो मात्र सातपुडा व विंध्याद्रित भिल्लांची लक्षणीय वस्ती आहे.

''जेम्स औट्म'' इंग्रज सेनापतीने त्यांचेवर हल्ले करून त्यांना गप्प बसविण्यात भाग पाडले ''एल्फिन्स्टन व किंग्ज'' या मुत्सद्दी कमिशनरांनी यांच्यातील वीरश्रीचा उपयोग करून घ्यावा म्हणून त्यांचे सैनिक पथक तयार केले. नंतर या भिल्लांनी त्यांच्याशी निष्ठा राखली.

''हंटर व ग्रिअर'' सारख्या लोकांनी आपल्या साम्राज्याला सूचना करून ठेवल्या होत्या त्या फारच भयानक अशा होत्या परंतु स्वातंत्र्यप्राप्तीमुळे तो प्रसंग टळला. त्यांनी ठरविले होते की, जर हिंदु नि मुस्लीम बिथरले तर साम्राज्याचे शेवटचे आधारस्तंभ म्हणून ''आदिवासीयांना'' वापरता येईल. असा ''हंटर व ग्रिअर'' या दुकलीचा दूरदृष्टीचा विचार होता. या गोष्टी कशा कराव्यात याचा शंभर वर्षापूर्वी त्यांनी विचार करून ठेवला होता.

अशा या आदिवासीयांचा प्रश्न अद्याप पूर्णत: सुटलेला नाही.

## सह्याद्रितील अन्यजाती

भिल्लांप्रमाणे, वारली, कातकरी, काथोडी, मल्हार कोळी, महादेव कोळी, टोकरे वा ढोर कोळी अशा काही वन्य जमाती ठाणे, नाशिक, अहमदनगर, पुणे, रायगड आदि जिल्ह्यातून लक्षणीय आढळून येतात.

आदिवासीयांना जंगलातील पशुपक्ष्यांची माहिती, शिकारीचे कौशल्य, ऋतूचक्राचा परिचय, वनस्पतीची, जमीनीची, फळाफुलांची, रानटी प्राणी, रानटी वनस्पती, कामचलाऊ वैद्यकिय उपचार यांची थोडीफार ओळख त्यांना उपलब्ध असते.

अरण्यमय जीवनात त्यांना जो निर्भेळ आनंद उपभोगता येतो त्यासाठी या लोकांनी संगीत कला

अवगत करून ठेवली आहे. निरनिराळ्या आदिवासीयांमध्ये त्यांची वेगवेगळी वाद्येही प्रचलित आहेत. इतकेच नव्हे तर अनेक नृत्यप्रकार त्यांच्यात आहेत. टिव्हीवरही अलिकडे काही जमातींचे नृत्यप्रकारही सादर करण्यात येत आहेत.

काही आदिवासी जमातीत लोकशैलीची चित्रकलाही पाहावयास मिळते माझ्या आदिवासी पुरस्कारवेळी ठाणे जिल्ह्यातील एका आदिवासी गृहस्थाने लोक शेतीतील उत्तम प्रकारे चित्र साकारलेले होते त्याची प्रदेशातही प्रशंसा झाली इतके ते सुंदर व अद्वितीय होते.

अकबर बादशहाचा धार्मिक सल्लागार अबुलफैजल याने आपल्या ऐन-इ-अकबरीत भिल्लांची शिस्तबद्ध वागणूकींची नि उद्यमशिलतेची स्तुती केली आहे. अबुल फैजलचे वास्तव्य बराच काळ सावद्या (सध्याच्या) परिसरात होते असे ''भिलराज' या हिंदी नाटकात उल्लेख आहे. त्याच्यात फैज या शब्दावरून ''फैजपूर'' हे नामानिधान प्राप्त झाल्याचा त्यात उल्लेख आढळतो. त्यावेळी ''तडवी भिल्लात'' ही धर्मांतर केल्याचा उल्लेख आढळतो.

अशा दरिद्री नारायण आदिवासींचा अल्पसा शोध व बोध

*(कै. मीरा तडवी यांच्या संग्रहातून)*

● ● ●

(पान १२ वरून)

खिशात जात असल्याचे सिद्ध होते. आणि म्हणूनच मणिपूरमधले कित्येक राजकारणी आणि राजकीय पक्षाच्या लोकांची हा दोन भिन्न जमातीविषयक वांशिक संघर्ष चालूच राहावा अशीच इच्छा आहे असे म्हणणे फारसे अतिशयोक्तीचे ठरणार नाही.

३१ डिसेंबर, ९३ ला मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली आणि मिळालेल्या माहितीप्रमाणे केंद्रसरकार एक संयुक्त व सर्वसमावेशक योजना उत्तर पूर्वेकडील सात राज्यांसाठी तयार करत आहे. आणि त्याचे सर्व अधिकार व आदेश हे सुरक्षा सल्लागाराच्या अधिपत्याखाली येतील.

नागा बंडखोर हे उत्तमरितीने संघटित झाले आहेत आणि त्यांना या बंडखोरी कारवायांचा प्रदिर्घ अनुभव आहे, ते राष्ट्रवादाच्या कळकळीने आणि वेड्या ध्येयवादाने प्रेरित झाले आहेत यात तिळमात्र शंका नाही. पण असे असले तरी कुकी जमातीला नागा बंडखोरांविरूद्ध वापरण्याचे कृत्य अमानवी असून ते थांबले पाहिजे. गेल्या ४०-४५ वर्षाचा अनुभव लक्षात घेतला असता वरील गोष्टीचा काही एक फायदा झाला असल्याचे दिसत नाही. कुकींचे रक्षण झाले पाहिजे हे खरे मात्र त्याबरोबर नागांचेही रक्षण केले पाहिजे. हे ही तितकेच खरे. राज्य सरकारने याबाबतीत पक्षपाती धोरणाचा अवलंब करू नये. सुरक्षा दले आणि सुरक्षा सेना या कुकी जमातीचा वापर नागा बंडखोरांविरूद्ध तोफगोळ्यासारखा करीत असल्या तरी त्यांनीही जमिनीसाठी भुकेलेल्या कुकी लोकांनी नागा लोकांवर केलेले जुलुम-जबरदस्ती याकडे एकवार नजर टाकावी.

आज नागा लोकांवर दबावतंत्र वापरून कुकी बंडखोर मणिपूर, आसाम नागालॅण्ड आणि म्यानमारचा काही भाग सोडून स्वतंत्र कुकी राज्याची मागणी करीत आहेत.

*(३१ डिसेंबर १९९३)*

● ● ●

# आदिवासी आणि ग्रामीण विकास


- वाहरू सोनावणे

''आदिवासी आणि ग्रामीण विकास किंवा सामाजिक, आर्थिक दृष्टीकोनातून आदिवासींचा झालेला विकास आणि विकास प्रक्रियेतील आदिवासींचे स्थान व सहभाग''-

विकास म्हणजे काय? विकास म्हणजे नेमके कशाला म्हणायचे या बाबतची संकल्पना स्पष्ट व्हायला हवी. सर्वसाधारणपणे विकासाचा अर्थ आर्थिक विकास असाच घेतला जातो. असा विकास म्हणजे परिपूर्ण किंवा सर्वांगीण विकास नव्हे, अशा विकासाला एकांगी विकास असे म्हणता येईल.

या आधुनिक जगामध्ये कोणत्याही समाज घटकाचा विकास एकांगीपणे होऊ शकत नाही. आणि झाल्यास तर तो दुसऱ्या समाज घटकांवर अन्याय करून किंवा त्या समाज घटकांचा शोषण करून झालेला विकास असतो आणि अशा प्रकारे दुसऱ्या अंगास अन्याय करून किंवा त्या अंगाचा शोषण करून केलेल्या विकासाला, विकास असे म्हणता येणार नाही.

देशांत होणाऱ्या भरपूर उत्पादनावर कोणाचा हक्क असतो? उत्पादनाचा वाटा कोणाला किती मिळतो याचा विचार ''विकास प्रक्रिये'' बाबत विचार करतांना केला पाहिजे. आज मेहनत करून उत्पादन करणाऱ्याला उत्पादनातील हिस्सा मिळत नाही आणि हक्कही नसतो. अशा अवस्थेत होणारा विकास हा नेमका काय असतो हे अगोदर समजून घेतले पाहिजे.



हो, दहा शेळ्यांसाठी दहा हजार रु. कर्ज मिळाले. पण व्याजापोटी 3000 रु., मोठ्या साहेबाला 2000 रु., छोट्या साहेबाला, कारकुनाला, शिपायाला ........ उरलेल्या पैशातून फक्तीच शेळी विकत घेऊ शकलो.

गांव म्हटल्या नंतर गांव एकसंध दिसत असला तरी गांवचे जीवनमान एकसंध नसते, विभागलेले असते, गांवचा प्रत्येक घरचा माणूस समाज असत नाही कोणी भरपूर शेतीवाला शेतमालक असतो, कोणी मध्यम, कोणी गरीब शेतकरी असतो, तर कोणी शेतमजुर तर कोणी लघुउद्योगवाला असतो. कोणी मोटारीने चालतो, कोणी मोटार-सायकलीने चालतो, तर कोणी सायकलीने चालतो तर कोणी पायीच चालतो. कोणी टिपटॉप राहतो, तर कोणी फाटकाच. कोणी पोटभर जेवतो तर कोणी चटणी भाकर, तर कोणी वेळ प्रसंगी उपाशीच, कोणाचे पक्के घर तर कोणाचे कच्चे. कोणी फाटके घर तर कोणी उघड्यावर, कुणाची मुलं कॉलेजात तर कुणाची मुलं गुरं चारतात. अशा तऱ्हेची गांवची रचना आणि अवस्था असते, अशा अवस्थेत गांवचा विकास म्हणजे कसा मोजायचा? प्रश्न पडतो.

अशा अवस्थेत असलेल्या गांवचा विकास करण्यासाठी शासन, स्वयंसेवक संघटना, राजकीय पक्ष, गट, संघटना आपापले परीने आपला प्रयत्न करीत असतात. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजनैतिक, शैक्षणिक इत्यादी विकासाचे विविध अंग आहेत. या विविध अंगापैकी विशिष्ट अंगाने ते ते त्यांच्या परीने विकास करीत असतात.

आदिवासींच्या आर्थिक विकासाबाबत बोलायचे झाले तर शासन आदिवासींचा आर्थिक विकासासाठी आणि विकासाच्या नावाने करोडो रूपये खर्च करीत आहे. व्यक्तिगत पातळीवर आदिवासींचा आर्थिक विकास करण्यासाठी शासन आदिवासींना गाय, म्हशी, बकऱ्या, किराणा दुकान, लघुउद्योग, विहिर इत्यादीवर कर्ज आणि अनुदान मंजुर करीत आहे. विकासाच्या नावाने विकणाऱ्या ह्या कर्जाबाबतचा प्रत्यक्ष व्यवहार वेगळाच पडत असतो, सध्या सगळीकडे वशीलेबाजी आणि भ्रष्टाचार बोकाळला आहे. आदिवासी विकासाच्या व्यवहारातही मोठ्या प्रमाणावर घुसला आहे, आणि मजबूत होत आहे. आणि म्हणून आज लाच दिल्याशिवाय कोणतेच काम होत नाही ग्रामसेवक, तलाठी, तहसीलदार, गटविकास इत्यादी कार्यालयात जिथे जिथे लाभधारकाला कागदपत्र घेवून फिरावे लागते, संबंध येतो तिथं तिथं भ्रष्टाचाराच्या पाऊल खुणा स्पष्ट दिसतात. या विरोधात सगळेच बोलतात.

तत्वत: भ्रष्टाचाराला आणि वशिलेबाजीला विरोध दाखविणारे व्यवहारात वशिलेबाजीला आणि भ्रष्टाचाराला साथ देतात असे मोठ्या प्रमाणात दिसून येते. ज्यांत अशा व्यवस्थेत कर्ज घेणारे असाच विचार करीत असतात की, 'कर्ज मिळत आहे ना? मग दुनियेचा विचार करायचा नाही. व न मिळण्यापेक्षा जर लाच देऊन कर्ज मिळत असेल तर, तरीही कर्ज घ्यावे. अशी मानसिकता तयार होते आणि 'तुमचाही फायदा आणि आमचाही फायदा' असे लाभ घेणारे हसत खिदळत बोलत असतात. यात त्यांना काहीच गैर वाटत नाही. कांही बँकेचे मॅनेजर तर सरळ असा सल्ला देतात की, 'तुम्हाला १० हजार कर्ज मंजूर आहे. ५ हजाराची सबसिडी आहे तुम्हाला फक्त ५ हजार भरावे लागतील. जर तुम्हाला वस्तु घ्यायची नसेल तर असं करा की, तीन हजार तुम्ही घ्या आणि दोन हजार आम्हाला आणि ५ हजार इथेच जमा दाखवून कर्ज निल. अशा या सल्ल्या प्रमाणे अनेक प्रकार घडत असतात. ऐकले नाही तर ठिक, नाहीतर उद्या या, परवा यां अशा प्रकारामुळे लाभधारक शेवटी फिरून फिरून थकतो, वैतागतो आणि काही तरी लाच कबूल करून घेतो.

अशा या व्यवहारातून आदिवासींचा स्वाभिमान खतम होऊन जातो. आणि आदिवासीला फक्त लाचारी मिळते आणि लाचार होतो. आदिवासी विकासाच्या नावाने रस्ते, शाळा, आश्रमशाळा, दवाखाने इ. काढले जातात. त्यांच्यात ही वशिलेबाजी आणि भ्रष्टाचाराचे प्रतिबिंब दिसत असते.

घरकुल योजना राबविली जाते. या घरकुल योजनेबाबतही आदिवासींना विश्वासात घेतले जात नाही. आदिवासींना कसे घर हवे असते, त्यांच्या घराची रचना त्यांच्या गरजेप्रमाणे कशी असावी या बाबत आदिवासींचा विचार, विचारात घेतला जात नाही. जे गरजू आहेत त्यांना घरे द्यावीत. बस एवढाच विचार केला जातो आणि त्यांच्या उपाय योजनेप्रमाणे असं घर असावे तसेच घर बांधून त्यांचे कार्य उरकवून घेतले जातात, आणि अनेक उपाय योजनेबाबतही हाच दृष्टीकोन असतो.

आदिवासी विकासाच्या नावाखाली, धरणे बांधली जातात. खाणी खणल्या जातात, कारखाने काढले जातात आणि त्या त्या विभागातील आदिवासींना त्यांच्या अन्य वन्य भूमितून, हाकलून लावले जाते. आदिवासींना त्यांची मसानवट भोगवी लागते, त्यांची देवस्थाने सोडावे लागते आणि विस्थापनामुळे त्यांची संस्कृती नष्ट होण्याचा धोका निर्माण होतो. त्यांचे जगण्याचे साधन संपत्ती, जमीन त्यांच्या ताब्यातून काढून घेऊन त्यांना इतके दुबळे केले जाते की, मग त्यांच्यावर कसेही राज्य करता येते. भूमिहीन होवून रोजगारासाठी आदिवासीला वणवण भटकावे लागते.

ग्रामीण विकास आणि आदिवासी विकासाच्या नावाने ग्रामीण भागात अनेक सोसायट्या आणि बँका खोलल्या आहेत. पण या सर्व बँकांचा आणि सोसायट्यांचा व्यवहार नफा तोट्यानीच अवलंबून असतो. जिथ जिथं नफा तोट्याचा व्यवहार होतो तिथ तिथं शोषण होतेच. विकासाच्या नावाने न दिसणारे हे शोषण असते. या विकासामध्ये ज्या अटी आणि शर्ती असतात. त्या नफा या गोष्टीलाच मान्यता देतात. नफ्याच्या आधारावर होणारा व्यवहाराला मान्यता देणाऱ्याच्याच हातात सर्व सूत्र व नियंत्रण असते. आणि म्हणून अशा व्यवहारातून समाजात विषमता अधिक दृढ होत असते. अशा या व्यवहारातून समाज स्वावलंबी होत आहे असे वर वर दिसत असले तरी वास्तव तसे नसते. ही गोष्टही त्या दृष्टीने समजून घेतली पाहिजे. विकास असा असतो, या बाबतीत उदाहरणच द्यायचे झाले तर शब्दकोड्याचे उदाहरण देता येईल.

ज्याप्रमाणे आपण शब्दकोडे सोडवत असतो, तेव्हा आडवे अक्षर आणि उभ्या अक्षरांची अर्थ भरलेल्या शब्दांची जुळणी करीत असतो. आडवे आणि उभ्या अक्षरांची जुळणी जुळत असेल तर आपण समजतो की, कोडं सुटत आहे. आणि जर सुटत नसेल तर आपण समजतो की, कोडं सुटण्यामध्ये काही तरी

## - लेखकांसाठी -

*'हाकारा' हे आदिवासी प्रश्नांना वाहिलेले एकमेव मराठी नियतकालिक आहे. यातून आदिवासी जीवन, संस्कृती, साहित्य, सण, उत्सव, कला, तसेच आदिवासी कार्यकर्ते व आदिवासींमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे अनुभव, काही सेवाभावी व्यक्तींची व्यक्तीचित्रणे याशिवाय आदिवासींसंबधीच्या कथा, कविता इत्यादी सर्वप्रकारच्या लेखनांस प्रसिध्दी दिली जाईल. आपण आपले साहित्य नियमित पाठवीत जावे.*

**- संपादक**

गडबड आहे. तेव्हां याचप्रमाणे विकासाबाबत विचार करताना विचार केला पाहिजे. जर आर्थिक विकास होत असेल आणि त्यातून सामाजिक सांस्कृतिक या पर्यावरण इत्यादी अंगाचे शोषण होत असेल तर समजावे की, विकासात गडबड आहे. ज्यावेळी आर्थिक विकास होत असेल त्याचवेळी सांस्कृतिक, सामाजिक, राजनैतिक, पर्यावरण यांचा शोषण न होता, त्या अंगाचाही विकास होत गेला पाहिजे. अशा पद्धतीने होणारा विकासच खरा विकास आहे. मानवी विकासच खरा विकास आहे. विषमता नष्ट करून समता प्रस्थापित करणारा विकास आहे. असे म्हणता येईल.

या आधुनिक जगात समाजाचे मूल्य, धर्माच्या नीतीमूल्यांवर आधारलेले, वर्चस्व गाजविणारे मूल्य आहेत. आणि इकडून तिकडून ही मूल्ये पाठ्यपुस्तकातून वेगवेगळ्या साहित्यातून, वेगवेगळ्या माध्यमातून समाजावर संस्कार करीत असतात. ह्या मूल्यांवर आधारित संस्कार समाजातील विषमता दूर करतात. की विषमतेची दरी वाढवतात याचाही शोध घेण्याची गरज आहे.

आज लग्नासाठी आपापल्या धर्मातल्या जातीचाच या जमातीत लग्नाचा विचार केला जातो. पूजा अर्चा करतांना त्या त्या समाज घटकांची दैवते, दैवतांची पूजा, दुसरा समाज घटक करीत नाही. अजूनही ज्याच्या त्याच्या आपापल्या परंपरा आहेत. असे कां? या आधुनिक जगाच्या समाजात खूप प्रगती झाली आहे ना? यंत्र तंत्राचे आणि भरभराटीचे आधुनिक युग आले आहे असे म्हणतात ना ? मग हे अंतर कोण भरून काढणार? ही विषमता कोण दूर करणार ?

समानतेच्या मूल्यांवर आधारीत उपाय योजना आणि विकासयोजना करण्याची आवश्यकता आहे. यात लोकांचा सहभाग प्रत्यंत आवश्यक असावा. मानव केन्द्रित विकास योजनांची संकल्पना स्पष्ट करून त्या दृष्टीने प्रयत्न करण्याबाबत प्रबोधन करण्याची आवश्यकता आहे.

कोणताही धर्म, पक्ष, गट, संघटना, ग्रंथ यांच्या कार्याचा केंद्रबिंदू मानवातच असू शकतो आणि असायला पाहिजे पण जेव्हा या धर्मात, पक्षात, गटात, संघटनेत 'मीच सर्वश्रेष्ठ आणि मीच सत्य' असा अहम जागतो तेव्हा त्या धर्मात, पक्षात, गटात पंथात स्पर्धेची भावना निर्माण होते. तेव्हा ही भावना दुसऱ्याला तुच्छ समजतो आणि अशी ही भावना बळावली तर समाजात समता आणू शकत नाही. आणि मग आपल्या वर्चस्वाची समाजात भांडणे लादून संघर्ष उभा करतात आणि म्हणून एका समाजात एकोपा निर्माण होण्यापेक्षा त्यात दुरावा निर्माण होतो. समाजात माणसं एक दुसऱ्याचा द्वेष करायला लागतात. याच्यातून समाज तुटतो आणि देशही फुटतो.

● ● ●

## - वर्गणीदारांस सूचना -

ज्या संस्था व व्यक्तींची वर्गणीची मुदत संपली आहे, त्यांनी पुढील वर्षासाठीची वार्षिक वर्गणी रु. ५०/- फक्त त्वरित पाठवावी, ही विनंती.

- संपादक

# 'जात' - मूलतःच अन्यायी समाजव्यवस्था

- ग. शां. पंडित

आपली समाजव्यवस्था प्रारंभी जातिभेद व चातुर्वर्ण्यावर आधारलेली होती आणि जातिव्यस्थेची उत्पत्ती ही वर्णव्यस्थेतून झाली असे सर्वसामान्यपणे म्हटले जाते. जातिव्यवस्थेचे समर्थन करणाऱ्या काही विद्वांनानी याकरिता वर्णव्यवस्थेच्या सैद्धांतिक स्वरुपाचा वापर केला. आहे. काही धर्मग्रंथकारांनी जातींची उत्पत्ती वर्णसंकरातून झाली असे सांगितलेले आहे. [illegible]सूत्रात, स्मृतिग्रंथात व पौराणिक ग्रंथातूनही चातुर्वर्ण्याचा उल्लेख सापडतो. त्याअर्थी त्या काळातही जातिव्यवस्था अस्तित्वात असावी, असे म्हणावयास हरकत नाही. अनेक विद्वानांनी जातीच्या उत्पत्तीविषयी आपापले सिद्धान्त मांडलेले आहेत काही विद्वानांच्या मते जातिसंस्था हिंदूंच्या परंपरेनुसार चालत आली आहे. त्यांच्या सिद्धान्ताप्रमाणे ब्रम्हदेवाच्या मुखापासून निर्माण झालेल्या ब्राह्मणांनी ज्ञानोपासना करावी. विद्यादान करावे. क्षत्रिय बाहूपासून निर्माण झाले म्हणून त्यांनी संरक्षणाचे काम करावे. वैश्य हे जांघेपासून निर्माण झाले; त्यांनी शेती, व्यापार व इतर उद्योगधंदे करावे व शूद्रांनी जे पायापासून निर्माण झाले त्यांनी सर्वांची सेवा करावी. अशा प्रकारे उच्च-नीचतेच्या स्तरावर चार वर्णांची निर्मिती झाली. हा सिद्धात शास्त्रीयदृष्ट्या मान्य होत नाही. परंतु याचप्रमाणे अनेक विद्वानांचे जातीच्या उत्पत्तीबाबत मतभेद दिसून येतात. काहीही असले तरी चातुर्वर्ण्य-व्यवस्थेचे प्राबल्य अगदी प्राचीन काळापासून समाज-मनावर कायम टिकून आहे.

खरे तर समाजाचे संघटन टिकावे आणि व्यक्तींनी गटागटाने विकास साधावा याच उद्देशाने जातिसंस्था उदयास आली; पण आज तिच्यामुळेच समाज असंघटित होऊन त्याचा विकास खुंटला आहे, अस्थिरता निर्माण झाली असेच दिसून येते.

जातीच्या श्रेणीत वरच्या जाती ह्या अधिकाधिक शुद्ध व प्रवित्र असे मानण्यात आले. याप्रमाणे उच्चनीचतेच्या कल्पनेबरोबर स्पृश्यास्पृश्य आणि विटाळाची कल्पना अस्तित्वात आली. नीति-नियमांच्या आहार-विहाराच्या व आचार-विचारांच्या भिन्नतेमुळे जाती-जातिमधील पवित्र-अपवित्र या कल्पनेला बळकटी आली. शुद्र वर्णातील लोक हे अपवित्र किंवा अस्पृश्य म्हणून संबोधले जाऊ लागले. अस्पृश्यांना (शूद्रांना) सवर्णांची सेवा करण्याखेरीज अन्य कोणतेही काम करण्याची परवानगी नव्हती. त्रेतायुगात जंबूक नावाच्या शूद्राने तपश्चर्या करणे हा अधर्म असल्याने श्रीरामाकडून त्याचा वध करण्यात आला. किंवा कर्ण हा पांडवांचा बंधू असूनही कुतीला तो विवाहाअगोदर झालेला असल्यामुळे सूतपुत्र म्हणून त्याची अवहेलना झाली. ही उदाहरणे पौराणिक काळातही मिळतात. यावरून त्या काळातही पवित्र-अपवित्रतेची कल्पना अस्तित्वात होती असे दिसते.

मध्यकाळात विटाळाच्या कल्पनेने उग्र रुप धारण केले. हीन जातीची व्यक्ती ही उच्च वर्णियांच्या, विशेषत: ब्राह्मणांच्या जवळ आली किंवा तिची सावली अंगावर पडली अथवा तोंड दिसले तरी तिच्यापासून विटाळ होतो, असे समजण्यात येत असे, विटाळाचा हा अंमल येथेच संपला नाही तर, अस्पृश्यांना गावातील काही सेवाही नाकारण्यात आल्या, परीट हे या लोकांची सेवा करीत नव्हते. हिंदूंच्या देवळात प्रवेश नाही, गावातील सार्वजनिक विहिरीचा वापर करता येत नसे. चावडीत अगर अंगणात किंवा कोणाच्या घरातही प्रवेश नव्हता. खेळ, करमणूक, उत्सव वर्ज्य, गावात

अस्पृश्यांची घरे गावाबाहेर असायची (आणि अजूनही तसेच आहे.) सतत मानहानी, छळ, दैन्य व कष्टाचे जीवन यामुळे या कनिष्ठ जाती हत:प्रभ झाल्या, जाती प्रथेनेच माणूस माणसाला अस्पृश्य मानू लागला. हीन लेखू लागला. चोखामेळा यांच्यासारख्या अस्पृश्य संताला हिंदू-समाजव्यवस्थेतील अन्याय तीव्रतेने बोचत होता हे त्यांच्या खालील अभंगावरून समजते -

'अवघ्या वर्णांनाजी हीन केली जाती ।
विटाळ विटाळ म्हणती क्षणोक्षणी ॥
कोणीही अंगिकार न करिती माझा ।
दूर दूर हो जा अवघे म्हणती ॥'

ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, एकनाथादी संतांनी भक्तिमार्गाने समाजातील हा भेदभाव नष्ट करण्याचा प्रयत्न केला. परंतु जातिसंस्थेतील संकुचितपणा व अस्पृश्यांना हीन लेखण्याची मनोवृत्ती यांच्याविरुद्ध जरी संतमंडळींनी आवाज उठविला होता, तरी त्यांना समाजातील स्पृश्यास्पृश्य विचार दूर करण्यात यश लाभले नव्हते. कारण त्या काळात सर्वांच्या मनावर कर्मकांडाचा प्रभाव होता. यामुळे तत्कालीन सामाजिक चौकट बदलणे हे त्यांना शक्यच नव्हते.

ब्रिटिश काळात सुरुवातीला काही प्रमाणात जातिव्यवस्थेचे प्राबल्य टिकून होते. परंतु लोकहितवादी, टिळक, आगरकर, फुले, म. गांधी यांसारख्या समाज सुधारकांमध्ये समाज-जागृतीची तळमळ निर्माण झाली आणि समाजामध्ये परिवर्तनाची चिन्हे दिसू लागली. राष्ट्रनिष्ठेच्या छत्राखाली सर्व समाज एकत्र आला आणि काही काळ जातीयता कमी झाली. परंतु हे चित्र कायम राहिले नाही. स्वातंत्र्योत्तर काळात पुन्हा नव्याने हे जातीयतेचे बीज फोफावले. फरक एवढाच झाला की, वर्णव्यवस्था नष्ट झाली आणि आर्थिक (व काही प्रमाणात सामाजिक) पायावर आधारलेली नवी 'वर्ग-व्यवस्था' अस्तित्वात आली. ज्यांना पूर्वी अस्पृश्य किंवा शूद्र म्हणून संबोधले जायचे त्यांना 'दलित' हे नवीन नाव मिळाले. आर्थिकतेचा निकष लावल्याने ब्राह्मण व इतर बहुजन समाज हे सवर्ण किंवा वरिष्ठांमध्ये गणले जाऊ लागले. परंतु जातिभेद मात्र नष्ट झाला नाही. उलट 'जात' ही एक सामाजिक रुढी म्हणून मान्यता पावली. विवाहसंबंध हे जातीपुरतेच मर्यादित ठेवणे, जातीच्या बाहेर विवाह करणाऱ्याशी सामाजिक व्यवहार न करणे हे जातीव्यवस्थेचे दुसरे महत्त्वाचे लक्षण आहे. जात ही एक अंतर्विवाह गट बनली. जातीतूनच अनेक पोटजाती निर्माण जाल्या. त्यामुळे पोटजातीच्या बाहेरही विवाह करणे हे बहिष्कृत ठरविण्यात आले.

जाती-व्यवस्थेने व्यवसाय, संस्कृती आणि अंतर्गत शासन याबाबतीत जातीचे स्वायत्त गट निर्माण झाले, आणि व्यक्तीची निष्ठा ही प्रथम तिच्या जातीवर आणि नंतर समाजावर राहिली. स्वत:च्या जातीत राहून मनोभावे जातीची कामे केल्याने मोक्ष लाभतो किंवा याहून उच्च जातीत जन्म होतो ही भावना धर्माने रुढ केली. उच्च जातीयांना त्याज्य असलेल्या गोष्टी नीच जातीयांना क्षम्य, ग्राह्य अगर आवश्यक म्हणून सांगण्यात आल्या. एवढेच नव्हे तर नीच जातियांची स्वत:बद्दलची भावनाही हीच राहिली.

जाती-व्यवस्थेने समाजात बालविवाह, हुंडापद्धती अशा अनेक समाजविघातक प्रथा निर्माण केल्या. आवश्यकतेनुसार व्यवसाय बदलण्याचे स्वातंत्र्य जाती संस्थेने हिसकावून घेतले. इतर व्यक्तींना शक्य असूनही तो व्यवसाय ठराविक जातीनेच करण्याचे बंधन असल्याने त्यात सुधारणा होण्याचा वाव राहिला नाही अलिकडे मात्र यात बराच मोठा बदल झालेला दिसून येतो. समाज जातीयवादाने पोखरल्यामुळे त्याचा राजकीय जीवनावरही विपरीत परिणाम झाला. संकुचित वृत्तीने, स्वार्थाने प्रत्येक व्यक्ती वागू लागली. आपापल्या जातीविषयी प्रत्येकाला व प्रत्येक गटाला अहंभाव निर्माण झाला. त्यामुळे ऐक्य नष्ट झाले व त्याने राजसत्ता दुर्बल झाली. व्यक्तीची जातीनिष्ठा राष्ट्रनिष्ठेपेक्षा श्रेष्ठ झाल्याने राष्ट्रावर ती करीत असलेल्या कृत्याचे विपरीत परिणामाकडे ती दुर्लक्ष करू लागली जातीसंस्थेने

जातीयवाद निर्माण केला आणि राजकीय हस्तक्षेपामुळे त्याला भ्रष्ट स्वरूप प्राप्त झाले. त्यामुळे प्रत्येक व्यक्ती- मग ती सामाजिक कार्यकर्ता असो, सरकारी नोकर असो वा राजकीय क्षेत्रात असो संकुचित वृत्तीने व्यवहार करू लागली जातीधर्म-निरपेक्ष समाज निर्माण करण्याची आपण प्रतिज्ञा केली. पण स्वातंत्र्योत्तर काळात राजकारणात जातीय भावनेला खतपाणीच मिळाले. सत्तेसाठी जातीयवादाचा उपयोग केला गेला. त्यामुळे संबध समाजातच फुटीरतेची साथ फैलावली.

आज दलितांमध्ये सुद्धा नवा सुशिक्षित मध्यवर्ग निर्माण झाला आहे. परंतु तो मनाने पांढरपेशा बनतो आहे. आपल्या शासनाने दलितांना घटनात्मक संरक्षणाची व सवलतीची अमलबजावणी करुनही दलितांचे प्रश्न पूर्णपणे सुटलेले नाहीत किवा ते पूर्णपणे सुटतील असेही नाही. कारण त्यांचे प्रश्न मूलतः सामाजिक परिस्थितीशी गुंतलेले आहेत. घटनात्मक सवलतींचा फायदा फारच थोड्यांना मिळाला आणि तळातले बहुसंख्य लोक तसेच राहिले. विशेष म्हणजे त्यामुळे दलितात वरिष्ठ आणि कनिष्ठ असे दोन वर्ग, अस्तित्वात आले. यातला वरिष्ठ (मध्यम) वर्ग हा प्रस्थापितांशी जवळीक साधून आपला उत्कर्ष साधून घेत आहे. परंतु आपल्या कनिष्ठ बांधवांकडे त्यांचे दुर्लक्ष होत आहे; ही चिंतेची बाब आहे.

दलित-मुक्तीची समस्या सोडवायची असेल तर शासनाने त्यांना शिक्षणाबरोबर अन्य सवलती इ. स. २००० पर्यत चालू ठेवाव्यात असे प्रसिद्ध विचारवंत प्रा. गं. बा. सरदार यांनी असे मत व्यक्त केले होते. शिक्षित झालेल्या वर्गाने केवळ स्वतःचाच स्वार्थ साधू नये. सवलती घ्यायच्या त्या सर्वांच्या प्रगतीसाठी एवढेच नव्हे तर या सवलती प्रत्येक शिक्षित दलिताने खेड्यापाड्यातल्या अडाणी लोकापर्यत नेऊन पोचविल्या पाहिजेत. जर या सवलतीचा गैरउपयोग होत असेल, तर ते चूक आहे हे त्यांनी निदर्शनास आणून द्यावे. दलितांच्या स्वतंत्र संघटनांनी आपल्या समाजाच्या सर्वांगीण प्रबोधनासाठी नेटाने प्रयत्नशील राहिले पाहिजे. सवर्ण लोक शिक्षित आहेत. पण जोपर्यंत त्यांच्या विचारात खऱ्या अर्थाने परिवर्तन होत नाही तोवर अस्पृश्य समाज उपेक्षितच राहणार असे प्रा. सरदार म्हणतात.

समाजातल्या सामान्य माणसाचे वैचारिकदृष्ट्या परिवर्तन करणे हे काम तसे अवघड आहे कारण समाज हा बव्हंशी अशिक्षित आहे त्याच्यावर जुन्या विचारांचा, परंपरेचा, रुढीचा, धार्मिक आचारविचारांचा जबरदस्त पगडा आहे. काहीवेळा चुकीच्या मार्गदर्शनामुळे समाज अधिकच गोंधळलेला आहे. भूतकाळातील विचारांचा, परंपरांचा खरा अर्थ त्याला मुळीच समजलेला नाही. कित्येक गोष्टी या अंधश्रद्धेपायी केल्या जातात. शिवाय सत्ताधारीवर्ग आपल्या स्वार्थासाठी लोकांच्या धर्मश्रद्धेचा वापर करतात. त्यामुळे जातीधर्म सापेक्षच समाज निर्माण होण्याची शक्यता मूळ धरू लागली आहे.

समाजात खऱ्या अर्थाने परिवर्तन घडवून आणायचे असेल तर प्रथम सामाजिक व्यवहारातली धर्माची लुडबुड थांबली पाहिजे. सर्व समाज शिक्षित होऊन त्याची ज्ञानलालसा वाढली पाहिजे. समाजात जे विचारवंत आहेत ते केवळ ज्ञानी असून चालत नाही. तर त्यांना समाजाच्या हिताची कळकळ पाहिजे. आज युवकांचे नवनेतृत्व उदयास येत आहे; परंतु प्रस्थापित नेतृत्त्वाने आपल्या समाजाच्या उज्ज्वल भविष्यासाठी कोणत्या मार्गाने जाणे श्रेयस्कर आहे. हे पटवून देणे आवश्यक आहे. असे प्रा. सरदारांचे मत होते. जातीयवाद हा क्रांतीच्या मार्गाने नष्ट होणार नाही. कारण जातीसंस्थेला फार मोठा परंपरा लाभली आहे. शिवाय जात ही जन्मावर अधिष्ठित आहे. त्यामुळेच जातीचे समाज-मनावरचे प्राबल्य प्रभावी आहे. यासाठी उत्क्रांतीच्याच मार्गाने परिवर्तन घडवून आणणे श्रेयस्कर आहे. जात ही मूलतःच अन्यायी समाज-व्यवस्था असल्यामुळेच कदाचित 'जी जात नाही ती जात' अशी श्री. म. माटे यांनी जातीची व्याख्या केलेली असावी.

● ● ●

# "किंग लायेन"

- भुंजग मेश्राम

किती गा डिंकावानी घट्ट तुहा हट्ट
सांग मंजे सांग
ऐक मंजे ऐक
सांगाया हायच काय
ऐकाया उतू चाल्ले कान
आताठावकोर सांगता सांगता
किती कथांच्या सातबाऱ्यात मी केले फेरफार
किती कथांची लावली भांडणं
किती सपनांचं केले दळण कांडण
पर तुनं सांगल्याल्या
सेनूमाची गोठ घडली नाहे कवाच।
यवडी फुसाडी गोठ कसी भरली डोळ्यात?
जंगलाचा हमेशा परमार सिंव्हच राज
जसा गावठाणावर शेणाचा उकंडा
राज असल्यावाणी फायजेच मोट्ठ राज्य
आन् भुकेसाठी-शिक्षेसाठी प्रजा
म्हणून मोट्ठं राज्य आन् प्रजा चिल्लर
राजाला असावा लागतो भाऊ
आळशी, कपटी, ऐतखाऊ
तसा डिक्टो असतो
त्याची नजर असते वाईट
त्याची वासना पटाईत
त्याला होआव वाट्टे किंग लायेन।
राजाला राणी, राणीला गोरागोमटा पोर्गा
आडवा भामट्टा काळा भाडोत्री लांडग्यांचा तांडा
बछड्याची मैत्रीण कारकोचीत पाठराखीन
रानवनात उड्या गुहेत लपालपी
शिखरावर भावाभावाची झोंबाझोंबी
राजा कडेलोट बछड्याची ससेहोल्पट
बछड्याला मंतात छावा
पर त्याला नस्ते छावणी
त्याची नव्यानं आवणी
डुक्कर मंजी कुत्र्यावानी जोहार
बाकी सम्दा यव्हार !
छावा व्हतो जवान मैत्रीण भेटते मधात
माकडीन भगतावानी देते कानमंत्र
छावा व्हतो सिंव्ह परत येतो बुंई
काका-पुतण्याची लडाई
नेहमी परमान
सत्याचा इजय आन् खोट्याची मराची पाळी
तसा काळा मरतो
छावा किंग लायेन होतो।
खेळ खल्लास झाल्यावरबी
एक सवाल जळते हायते दिव्यावानी
किंग लायेन -
खरा असतो म्हणून भूरा असते
कि भूरा असते म्हणून सत्यवान?
छाव्याचा काका
दुष्ट असते म्हणून काळा
कि काळा म्हणून दुष्ट घातकी?
आयुक्शाचा सेनूमा गमतीसाठी असतो का?
महया नात्रा,
पुन्हा भरवायची ना किंग लायेनची साळा?

● ● ●

# "गुपित"

- भुजंग मेश्राम

त्याहनी बोलाचं मह्याबद्दोल
मात्रम मी गप्प रहाचं कोट्रोक ?
पांडऱ्या मातीच्या शब्दांयनी
लिपली जाईल
इतिहासाची गढी
आन् गंजून जाआयची महया जबानीची तोप

तवा बोल्लंच फायजे सत्य
सोंग करु करु, मायच्यान
त्याहनी हुभं केलं महाभारत
काळ्या अंधाराची त्यैना कुठली पारक?
त्याहनी मला टाकलं ठरवून
रानटी जंगली गुलाम हराम बिगारी भिकारी
मुकालुक्का आंधळा पांगळा बहिरा ऐरागैरा
त्यैंचा बुद्धीची किव येते अजूक
मी कदीबी नाहे केलं सोंग
कदीबी नाहे वाजोला फुसाड्या ढोल
मी कदीबी नोहतो दुक्की
जंगल जसं आतल्या आत सळसळते
तस्सा, तस्सा, मी सुखी
त्याहनी अजूक मला वळकलंच नाहये !

घसरगुंडीवरुन घसरावं तस्सं
ते महया सोसिक अबोल्याच्या
पारावर घसरले बिट लावून
घेतले आपापले झोरे भरुन
कटाईवानी केलं, भोगळं मन
वहागाच्या ठस्यांवरून करावी मोजदाद
तसी महया दुक्काची मारली चाट !

तरी मी नाये उघडलं तोंड
या सर्व देसी फॉरीनरवर
मी एकलाच हसलो पोटभर
खिखि खिखि खिखि -
मला नोहता ठाऊक दुक्काचा बाजारभाव
नाहेत् त्यालाच ठिवलं अस्तं खोटं खोटं गहाण !

पैल्यांदाचं मी बनलो येठबिगार
बिगारी मनुन आजी आजा, माय बाबा
आन् खटल्यासंग ढोरांच्या कोट्यात
किल्या तुरंगावानी मालकाच्या वाड्यात
हामचा सुरु झालां सौंसार

मालक चोदायचा पाटीलकी, चालायचा ऐटीत
मातर इस्टेटीत वाटणीच्या भितीनं
सोताच्या मायबापाला कोंडायचा तळघरात
आन् भैनीला आय भैनीवरून ....

गाई बैलांच्या गोठ्यात
बैलगायी करायचे रवोंथ
महा डंगरा आजा सांगाचा गोस्ट
बाप घराचा सांगाचा हट्ट

माय वहाडाची भुकेचं ताट
भईन भरवाची लाडाचा घास
बायकू खेळाची सपनांचा सारीपाट

गेचूड बसल्यावर कातडीची थर्थर
तशी समजायची भाशा
पुरानीने टोचल्याली जखम
चाटू लागली बैल की,
वळकायचं, आता पडणार पाऊस
जनावराच्या पिरमात हामची हौउस
बैलांना बापाच्या अंगावरलं
मीठ पसंद घामाचं, ते चाटाचं खर्रखर्र
बाप, घर्रघर्र .....

मालकाच्या वाड्याला हजार खोल्या
काहिक परकारच्या
मंजी ठरलेल्या येव्हारच्या
अमुक खोलीत तमुकला प्रवेस नाहे
तमुक खोलीत अंगारे धुपारे
ढमूक खोलीत तुरंग
ढमूक खोलीत ऊरूस
बाईमाणसाला पड्द्यावर पडदा
मर्दाला हटकता गुरू नाही ना दटकता चेला
पिंजऱ्यात पाळावी जनावरं
आन् सोता रहावा मोकळं
तसा महा ऊलट्या काळजाचा मालक
मातर त्येच्या काळजाला
हजार घरं

मह्या आजाला नाही दात
बापाला नाही दातावर मारायला ढब्बू
मह्या बांडीसला खिसाच नोहता
पर हामची सिरमंती काय सांगता

आजी हररोज काढायची डिस्ट
माय चंचीतून हररोज वाटायची सत्य
बायकू घासाची दगडांनी अंग
कष्टावानी निर्मळ ठेवाचो माझं मन
मालकाचा मारखौ एकाला घोडा
मने, मले बी थुमच्यात घ्या नं !

मी कदीबी दिली नाही घोड्याला चाट
नेमाने त्याची खाजवली पाठ
पाठीवर वझं असूनबी
डोकं अन् मन ठेवलं तल्लख
मी कदीबी नोहतो दुक्की
जंगल जसं आतल्या आत सळसळते
तसे जगणे होते
मायीच त्याहनी सत्य वळकलंच आहे !

● ● ●

# सूची


| | |
|---|---|
| अंक पहिला : जानेवारी -मार्च | १९८० - जबरन जोत जंगल जमीन |
| अंक दुसरा : एप्रिल-जून | १९८० - आदिवासी व शिक्षण |
| अंक तिसरा : जुलै-सप्टेंबर | १९८० - आदिवासी व वनसंवर्धन |
| अंक चौथा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८० - आदिवासी साहित्य व कला |
| अंक पाचवा : जानेवारी-मार्च | १९८१ - दलितांना सवलती व राखीव जागा माहिती |
| अंक सहावा : एप्रिल-जून | १९८१ - आदिवासी व आरोग्य |
| अंक सातवा : जुलै-सप्टेंबर | १९८१ - रोजगार हमी योजना |
| अंक नववा : जानेवारी-मार्च | १९८१ - उत्ताराखंड अभ्यास मोहीम |
| अंक दहावा : एप्रिल-जून | १९८२ - धरणे व विकास |
| अंक अकरा-बारा : जुलै-डिसेंबर | १९८२ - जंगल व्यवस्थापन |
| अंक तेरावा : जानेवारी-मार्च | १९८३ - आदिवासी व दारू |
| अंक चौदावा : एप्रिल-जून | १९८३ - आदिवासींच्या सामाजिक / राजकीय चळवळी |
| अंक पंधरावा : जुलै-सप्टेंबर | १९८३ - प्रा. सरदार गौरव अंक / आदिवासी साहित्य |
| अंक सोळावा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८३ - आदिवासी साहित्य व सामाजिक प्रश्न |
| अंक सतरा-आठरा : जानेवारी-जून | १९८४ - आदिवासींमधील स्वयंसेवी कार्य |
| अंक एकोणिसावा : जुलै-सप्टेंबर | १९८४ - आदिवासी स्त्री |
| अंक विसावा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८४ - आदिवासी आरोग्य व शिक्षण |
| अंक एकविसावा : जानेवारी-मार्च | १९८५ - आदिवासी संघटन |
| अंक बाविसावा : एप्रिल-जून | १९८५ - जमीन हस्तांतर |
| अंक तेविसावा : जुलै-सप्टेंबर | १९८५ - आदिवासी महिला |
| अंक चोविसावा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८५ - आदिवासी व सरकार |
| अंक पंचविसावा : जानेवारी-मार्च | १९८६ - जंगल व धरण |
| अंक सव्विसावा : एप्रिल-जून | १९८६ - आदिवासी कला |
| अंक सत्ताविसावा : जुलै-सप्टेंबर | १९८६ - आदिवासी व वेठबिगारी |
| अंक अठ्ठाविसावा : ऑक्टोबर-डिसेंबर | १९८६ - आदिवासीविषयक ग्रंथ मानवशास्त्र परिचय |
| अंक एकोणतिसावा : जानेवारी-मार्च | १९८७ - भटक्याविमुक्त जमातींचे प्रश्न |
| अंक तिसावा : एप्रिल-जून | १९८७ - आदिवासी आणि सांस्कृतिक बदल |
| अंक एकतीस-बत्तीस : जुलै-डिसेंबर | १९८७ - राष्ट्रीय वननीतीचा प्रश्न |
| अंक तेहतीस : जानेवारी-मार्च | १९८८ - सवलती अपहरणाची समस्या |
| अंक चौतीस : एप्रिल-जून | १९८८ - आदिवासी साहित्य |
| अंक पस्तीस-छत्तीस : जुलै-डिसेंबर | १९८८ - आदिवासी समाज व संस्कृती |
| अंक सदतीस-अडतीस : जानेवारी-जून | १९८९ - डॉ. वेरीअर एलवीन विशेषांक |
| अंक एकोणचाळीस-चाळीस : जुलै-डिसेंबर | १९८९ - व्यवसाय मार्गदर्शन |
| अंक एकेचाळीस-बेचाळीस : जानेवारी-जून | १९९० - महाराष्ट्रातील आदिवासींची परिस्थिती |
| अंक त्रेचाळीस : जुलै-सप्टेंबर | १९९० - जागतिक आदिवासी |
| अंक चव्वेचाळीस : ऑक्टोबर-डिसेंबर | १९९० - गं. बा. सरदार स्मृति विशेषांक |
| अंक पंचेचाळीस-सेहेचाळीस : जानेवारी-जून | १९९१ - आदिवासी साहित्य संमेलन विशेषांक |
| अंक सत्तेचाळीस : जुलै-सप्टेंबर | १९९१ - आदिवासींच्या विकासात्मक व सांस्कृतिक समस्या |
| अंक अठ्ठेचाळीस : ऑक्टोबर-डिसेंबर | १९९१ - आदिवासी जीवन व संस्कृती |
| अंक एकोणपन्नास-पन्नास : जानेवारी-जून | १९९२ - सर्वसाधारण आदिवासी |
| अंक एक्कावन-बावन : जुलै-डिसेंबर | १९९२ - अनुताई वाघ विशेषांक |
| अंक त्रेपन-चोपन्न : जानेवारी-जून | १९९३ - आदिवासी धर्म, सण व उत्सव |
| अंक पंचावन-छप्पन : जुलै-डिसेंबर | १९९३ - धरण-विस्थापन व पुनर्वसन |
| अंक सत्तावन : जानेवारी-मार्च | १९९४ - सर्वसाधारण आदिवासी |
| अंक अठ्ठावन्न : एप्रिल-जून | १९९४ - आदिवासी एकता परिषद |
| अंक एकोणसाठ : जुलै-सप्टेंबर | १९९४ - आदिवासी विकासाची सैद्धान्तिक भूमिका |
| अंक साठ : ऑक्टोबर - डिसेंबर | १९९४ - आदिवासी जमाती |
| अंक एकसष्ठ - बासष्ठ : जानेवारी - जून | १९९५ - राणीपूर विशेषांक |
| अंक त्रेसष्ठ : जुलै-सप्टेंबर | १९९५ - कुपोषण विशेषांक |
| अंक चौसष्ठ : ऑक्टोबर - डिसेंबर | १९९५ - पर्यावरण विशेषांक |

Registered with the Registrar of News Papers of India Under No. 35835/80

## महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन, कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण.

शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकत्र व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे.

मानव विज्ञान व सामाजिक शास्त्र यांच्या शिक्षकांना व विचारवंताना, मुख्यत: आदिवासींबाबत अभ्यासकांना एकत्र आणणे.

मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन, प्रकाशन.

या उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशाचे मूर्त स्वरुप म्हणून 'हाकारा' सुरु करण्यात आले आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारुन आपणही या कार्यात सहभागी व्हावे. (संस्थांना फक्त 'हाकारा' चे वार्षिक सदस्यत्व मिळेल)

## मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व

आजीव सभासद ५०० रुपये (फक्त व्यक्तींसाठी)

हाकारा वार्षिक सभासद ५० रुपये (व्यक्ती व संस्था दोन्ही)

परिषदेच्या सभासदांना 'हाकारा' विनामूल्य पाठविला जातो. आपले सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' (दि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ ॲन्थ्रॉपॉजिकल सायन्सेस) यांचे नावे डिमांड ड्राफ्ट अथवा मनी ऑर्डरने पाठवावी. मनीऑर्डर करताना फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव पूर्ण पत्ता लिहिण्यास विसरू नये.

**पत्रव्यवहाराचा पत्ता :**

रा. के. मुटाटकर, सचिव

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

६४, आनंद पार्क, औंध,

पुणे - ४११ ००७.

**आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा आहे.**

Printed by Jnana Prabodhini Mudran Vibhag, Pune - 30.